
# आता वंदू कवीश्वर



रत्नाकर महाजन

# आता वंदू कवीश्वर

रत्नाकर महाजन

ई साहित्य प्रतिष्ठान

# आता वंदू कवीश्वर

## (मराठी काव्याच्या २००० वर्षांच्या प्रवासाचा आढावा)

रत्नाकर महाजन

ramahajanp@yahoo.com

ph. 8879011951

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते

ई प्रकाशक :

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

ई प्रकाशन : १२ फ़ेब्रुवारी २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत -

मी आपल्यासारखाच एक काव्यरसिक. कवितांचे संग्रह जमा करणे हा माझा छंद. माझ्या घरी माझा स्वत:चा असा एक कवितांच्या पुस्तकांचा मोठा संग्रह आहे. त्यात असलेल्या प्रस्तावना आता दुर्मिळ आहेत. त्यांचा उपयोग करून कवींची आणि त्यांच्या कवितांची ओळख करून द्यावी या हेतूने मी हे पुस्तक लिहायचा निश्चय केला.

हे करीत असताना, पहिला कवी कोण असा विचार मनात आला. संत, पंत आणि तंत (शाहिरी काव्य) यांचा मागोवा घेत, थेट मराठीतला पहिला काव्य संग्रह गाथासप्तशती जो इसवी सनाच्या  पहिल्या शतक रचला गेला, इथपर्यंत मागे गेलो. मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारा हा आद्य मराठीतील श्रेष्ठ ग्रंथ होय.

माझ्या निवृत्तीच्या काळात मिळालेल्या वेळेचा उपयोग करून इंटरनेट प्रमाणेच इतर पुस्तके यातून माहिती जमवली आहे.

प्राचीन कवी मुकुंदराज ते नरेंद्र, संतकवी सावता माळी ते नामदेव; ज्ञानेश्वर - एकनाथ - तुकाराम, रामदास, पंतकवी मुक्तेश्वर ते मोरोपंत, शाहीर अनंत फंदी ते पठ्ठे बापुराव, अर्वाचीन कवी नव्या युगाचे प्रवर्तक केशवसुत; रविकिरण मंडळ; बापट-विंदा-पाडगावकर, आधुनिक नव काव्याचे प्रवर्तक बा. सी . मर्ढेकरांपर्यंत अनेक कवींच्या काव्याची झलक येथे वाचायला मिळेल.

कवीची खरी ओळख ही त्याच्या काव्यातूनच होते. त्यामुळे कवींची माहिती देताना त्यांची जात, त्यांना सहन करावे लागलेले अत्याचार, त्यांनी केलेले चमत्कार, त्यांच्या विषयीच्या आख्यायिक, दंतकथा टाळल्या आहेत. त्या नेटवर उपलब्ध आहेतच.

आचार्य अत्रेंनी एके ठिकाणी लिहिले आहे की 'ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली किंवा रेड्याच्या मुखातून वेद वदवले याहीपेक्षा त्यांचा मोठा चमत्कार म्हणजे वयाच्या २०-२१ व्या वर्षी ज्ञानेश्वरीसारखा एक अद्भुत ग्रंथ रचला आहे आणि तो आपल्यासमोर आहे' हा केवढा मोठा चमत्कार आहे.

माझी भूमिका या महान साहित्यरूपी सागराच्या तळाशी जाऊन, उत्तमोत्तम मोती शोधून आणून वाचकांच्या ओंजळीत द्यायचे. त्यामुळे मी संग्रहक, संकलक आणि संपादक अशा भूमिकेतून काम केले आहे.

माझ्यासारख्या काव्य रसिकांना हे पुस्तक वाचून अधिक जाणून घ्यायची इच्छा व्हावी हीच माफक अपेक्षा.

"फोडिले भांडार

धन्याचा हा माल

मी तव हमाल

भारवाही."

संकलक, संपादक रत्नाकर महाजन

---------------------------------

श्री रत्नाकर महाजन हे वयाची ऐंशी ओलांडलेले एक तरुण लेखक. निवृत्तीनंतर त्यांच्या वृत्ती विशेषत्त्वाने प्रफ़ुल्लीत झाल्या. त्यांनी भारतीय हवाई वाहतुकीवर तीन खंडांचे एक पुस्तक लिहीले. त्यानंतर ई साहित्य प्रतिष्ठानसाठी पंख १ आणि पंख २ ही जागतिक हवाई वाहतुकीच्या इतिहासाची तोंडओळख करून देणारी दोन ई पुस्तके त्यांनी लिहीली. याच काळात ओरिगॅमी या विषयाचा सखोल अभ्यास करून त्यांनी अनेक ठिकाणी प्रात्यक्षिकांसह भाषणे केली. लोकांच्या आग्रहानुसार त्यांनी ओरिगॅमी या विषयावरही एक पुस्तक लिहीले जे ज्योत्स्ना प्रकाशन यांनी प्रकाशित केले. आपल्या अभ्यासाच्या कक्षा रुंदावत त्यांनी हिंदू धर्मग्रंथांचा मुळापासून अभ्यास करायला घेतला व त्यावरही “धर्मग्रंथ” नांवाचे एक सुंदर वाचनीय पुस्तक लिहून ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिले.



या सोबत संगीत आणि वाचन यांद्वारे ते सतत नवीन नवीन काही शिकत असतात व त्यावर स्फ़ुट लेखन करणे हा त्यांचा छंद आहे.

तरुणांना लाजवील असा त्यांचा उत्साह कायम वृद्धींगत राहून त्यांना उदंड अयुष्य आणि उत्तम आरोग्य लाभो व त्यांचे कडून वाचकांची व मायमराठीची सेवा घडो हीच आमची शुभेच्छा!

टीम ई साहित्य

# “आता वंदू कवीश्वर”

“आता वंदू कवीश्वर जे शब्दसृष्टीचे ईश्वर” - संत रामदास

मराठी कवितेचा उगम शोधताना अनेक विलक्षण गोष्टी आढळल्या. त्या आपल्यापुढे सादर करताना मराठी भाषेचा आणि काव्याचा विकास बघून मन थक्क होते.

ज्ञानेश्वरीच्या रचनेचा काळ इ.स. १२९० हा निश्चित आहे. पण त्यापूर्वीच्या रचनेच्या काळांविषयी संशोधकांमध्ये तीव्र मतभेद आहेत. उदा: मुकुंदराज यांनी रचलेला विवेकसिंधू हा ग्रंथ काहींच्या मते इ.स. ११८८ हा आहे तर काहींच्या मते तो इ.स. १२९० चा असावा (१०० वर्षांचा फरक) ! यातून कोणते बरोबर आणि कोणते चूक हे ठरवणे अशक्य होते ! तीच गोष्ट इतर रचनांबद्दल म्हणता येईल !

महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या ‘अभिजात मराठी भाषा समिती'ने त्यांच्या २०१३ च्या अहवालात मराठी भाषेच्या उगम काळाची माहिती संकलित केली आहे. ही समिती स्थापन करण्यामागची कल्पना त्यांच्याच प्रस्तावनेत त्यांनी दिली आहे.

“ केंद्र सरकारने आजवर तमिळ, संस्कृत, तेलगु, कन्नड व मल्याळम या पांच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे. या दर्ज्यामुळे त्या भाषेच्या सर्वांगी विकासासाठी केंद्र सरकारकडून भरीव अनुदान मिळते.”

“मराठीला हा दर्जा मिळावा अशी तमाम मराठी भाषकांची इच्छा असल्यामुळे आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी सखोल संशोधन व अभ्यास करून पुरावे एकत्रित करण्यासाठी शासनाने या समितीची स्थापना केली.”

समितीचा अंतिम अहवाल मे २०१३ मधे शासनाला सादर करण्यात आला.

अहवालातील काही प्रमुख मुद्दे :-

१) प्राचीन महारठ्ठी भाषा, महाराष्ट्री- प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा या तीन वेगवेगळ्या भाषा नसून ती एकाच आधुनिक मराठी भाषेची तीन रूपे आहेत.

२) भाषा काही एकाएकी प्रगल्भ होत नाही. ती तशी होण्यासाठी अनेक शतके जावी लागतात. याचे शेकडो शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखित ग्रांथिक पुरावे आज उपलब्ध झालेले आहेत.

३) संस्कृत भाषेला संस्कृत हे नाव मिळण्याआधी महाराष्ट्री भाषा अस्तित्वात होती, एवढेच नाही तर ती प्रगल्भ झालेली होती.

४) रामायण व महाभारत ह्या प्राचीन ग्रंथांमध्ये शेकडो मराठी शब्द असल्याचे डॉ. अर्जुन वाडकर ह्यांनी दाखवून दिले आहे.

५) डॉ. पा.वा. काणे यांच्या मते इ.स.३०० मध्ये महाराष्ट्र हे नाव पडले. संपूर्ण देशात सुमारे एक हजार प्राचीन लेणी आहेत. त्यातील ८०० महाराष्ट्रात आहेत. त्यातील सगळे कोरीव लेख जुन्या मराठीत आहेत. सुमारे २२५० वर्षांपूर्वीच्या ‘विनयपीटक’ या पाली भाषेतील बौद्ध धर्मग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख मिळतो.

६) अकरा कोटी लोकांची मराठी ही जगातली दहाव्या ते पंधराव्या क्रमांकाची भाषा आहे. संपन्न ज्ञानभाषा असणारी मराठी महानुभावांची धर्मभाषाही आहे.

७) गाथासप्तशती - इसवी सनाचे पहिले शतक हा गाथासप्तशतीच्या निर्मितीचा काळ आहे.

सप्तशती म्हणजे सातशे आणि गाथा म्हणजे कविता. प्रत्यक्षात त्या १००८ कविता आहेत. मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारा हा आद्य मराठीतील श्रेष्ठ ग्रंथ होय.

हे महाराष्ट्राचे लोकसाहित्य आहे. त्यात काव्य कृत्रिमता अजिबात नाही. पशुपक्षांच्या जीवनाची लोभसवाणे चित्रणे खेळकर विनोद त्याच प्रमाणे रोखठोकपणा आणि कोमलता प्रतिबिंबित झालेले आहे. नमुन्यादाखल : (आजच्या मराठीत)

> " साळीचे शेत पिकून पांढरे झाले आहे म्हणून मान खाली घालून का रडते आहेस ?
> नटीने मुखाला हरितालाचा रंग लावून सज्ज व्हावे त्याप्रमाणे तागाचे शेत पिवळ्याधमक फुलांनी नटले आहे "

अशा प्रकारची अनेक काव्ये मानवी भावना हेलावून सोडणारी आहेत.

या अहवालाच्या आधारे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळेल अशी आशा करू या.

मराठीतला ‘आद्य ग्रंथ

संक्षिप्त मराठी वाङमय कोश - खंड १ मधे मराठीतला ‘आद्य ग्रंथ’ या शीर्षकाखाली दिलेल्या मजकुरातील काही भाग :

१) इ.स. १२७८ च्या सुमारास रचला गेलेला ‘ लीळाचरित्र ’ हाच आद्य ग्रंथ ठरतो असे अभ्यासकांचे मत आहे.

महानुभाव पंथांचे संस्थापक चक्रधर यांनी लिहिलेले काही वाङ्मय उपलब्ध नाही. परंतु त्यांच्याविषयीच्या आख्यायिका वेळोवेळी उतरून ठेवल्या गेल्या आहेत. या आख्यायिकांच्या संग्रहाला लीळाचरित्र असे नाव आहे. मराठीतील पहिला गद्य चरित्रग्रंथ म्हणून त्या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे. रचनाकाल १२८३ च्या आसपास. "

२) मराठी साहित्याच्या इतिहासाचा आरंभ यादवकालात होतो. त्यातला अत्यंत महत्त्वाचा पंथ म्हणजे नाथपंथ होय. (जोगळेकर, १९८४ : १७४)

३) " ग्रंथ लेखनासाठी आज जशी सामग्री उपलब्ध आहे तशी प्राचीन काळी नव्हती. कागदावर लिहिलेले उपलब्ध असे प्राचीनतम हस्तलिखित म्हणजे विठ्ठल गलंडकृत ‘रसिकीमोदी’ची इ.स. १५३४ मध्ये लिहिली गेलेली प्रत होय. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्या मते पंधराव्या शतकापर्यंत कागदाचा प्रसार महाराष्ट्रात नव्हता. महाराष्ट्रात बहामनी राजवटीत दौलताबाद, जुन्नर वगैरे ठिकाणी कागदाचे कारखाने निघू लागलेले असावेत. सोळाव्या शतकात पोर्तुगीजांच्या पश्चिम किनाऱ्यावरील आगमनामुळे त्यांच्या कागदाचा कोकणातून महाराष्ट्रात प्रवेश झाला. शिवकालापासून पुढे शिलालेख, ताम्रपट, कार्पासपट मागे पडून कागद सर्वत्र रूढ झालेला दिसतो." (शेजवलकर १९६४)

(संपादकः जया दडकर, प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके, सदानंद भटकळ)

'मराठी भाषा उद्‌गम आणि विकास'

लेखक : कृ.पा. कुलकर्णी (१९५०) यांच्या ग्रंथातील काही निष्कर्ष -

१) मराठी भाषेस इसवी सन ७०० च्या सुमारास बोलभाषा म्हणून पूर्णत्व आले असले पाहिजे.

२) दक्षिणापथ – महाराष्ट्र हे नाव फारसे जुने नाही. वराहमिहिर (इ.स. ५०५) याच्या ग्रंथात व सत्याश्रय पुलकेशी याच्या इ.स. ६११ सालातील बदामीच्या शिलालेखात महाराष्ट्राचा प्रथम उल्लेख सापडतो.

महाराष्ट्र या नावाने जो प्रदेश सध्या संबोधिला जातो त्या प्रदेशाला पूर्वी दक्षिणापथ ह्या नावाने
ओळखीत असत.

मराठीच्या लहानपणीच्या बाळसेदारपाणाची अंधुक का होईना पण काहीतरी कल्पना करून देणारे वाङमय दुर्दैवाने आज उपलब्ध नाही. त्याच्या अभावी ज्ञानेश्वरी व मानभावी वाङमयाच्या पूर्वीचा काळ अंध:कारमय आहे. ह्या निबिड अंधकारात कोठे कोठे कोपऱ्यात काही तुटपुंजी - शिलालेख, ताम्रपत्रे, उल्लेख वगैरे - साधने आपापल्या परीने प्रकाश पाडण्याचे काम करतात. ह्या प्रकाशाच्या साहाय्याने थोडीशी वाट काढणे शक्य आहे. शिलालेखांवरून तत्कालीन भाषेचे अस्तित्व सिद्ध होतेच.

# कवी आणि त्यांचे काव्य

कवीची ओळख मुख्यत्त्वे  त्याच्या काव्यातून होते. त्यामुळे यानंतरच्या भागात आपण कवींची माहिती त्यांच्या काव्यातून करून घेणार आहोत. अनेक संत कवी यांच्या रचनेचा काळ निश्चित कोणता ते कळायला मार्ग नाही. पण त्यामुळे काव्याचा आस्वाद घेण्यात काही अडचण येऊ नये असे वाटते.

"वाचे बरवे कवित्व | कवित्वि रसिकत्व |
रसिकत्वी परतत्व | स्पर्शु || संत ज्ञानेश्वर (१८.३४७)

"वाणीचा जो आविष्कार त्यात काव्य श्रेष्ठ, काव्याच्या संदर्भात रसिकत्वाचा धर्म महत्वाचा आणि त्या रसिकत्वात परतत्वस्पर्श असणे म्हणजे अध्यात्माचा स्पर्श असणे हे महत्वाचे. पण स्पर्श रसिकत्वात हवा. त्याच वेळी तो मूळ ग्रंथातही असावयास हवा. ग्रंथाचा विषय तेथवर पोचत असेल, तरच रसिकाला त्याचा लाभ होणार." डॉ. वि. रा. करंदीकर

सर्वच संत, पंत, तंत आणि आधुनिक कवी यांचा समावेश या छोटाश्या पुस्तकात करणे अशक्य आहे. त्यामुळे काही निवडक कवींचाच समावेश करणे शक्य झाले आहे. त्याचप्रमाणे काही काव्य अंशत: देण्यात आले आहे याचीही कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

# १) मुकुंदराज (११२०-१२१०)

'मराठीतले आद्य कवी' - यांची समाधी आंबेजोगाई - बीड, मराठवाडा येथे आहे.

नाथसंप्रदायाचे, आदि शंकराचार्यांचे अद्वैत सिद्धांताचे प्रसारक. ११८८ च्या सुमारास त्यांनी विवेकसिंधू आणि परमामृत असे दोन ग्रंथ रचले. यांच्या पूर्वीचे कुणी पद्य रचनाकार ज्ञात नसल्यामुळे मराठीतले आद्य कवी म्हणून यांचा उल्लेख केला जातो.

विवेकसिंधुत पूर्वार्ध आणि उत्तरार्ध मिळून एकूण १८ प्रकरणे आहेत. १६८४ पर्यंत ओवी संख्या आहे. गुरु-शिष्यसंवाद रूपाने येथे ब्रह्मज्ञान सांगितले आहे. शास्त्रीय विषयाचे यात निरूपण आले आहे. पहिल्या भागात सृष्टीची उभारणी, दुसऱ्या भागात सृष्टीचा संहार आणि जीव, प्रपंच, परमेश्वर, जीव मुक्ती यांचे विवेचन केले आहे.

‘ग्रंथीचे हेंचि चातुर्य । जे रोकडे स्वानुभव सौंदर्य ।
म्हणौनि सेवीतु मुनिवर्य । विवेकसिंधु हा ।।’

असे भाषासौष्ठव असणारा हा ग्रंथ रचनादृष्ट्या सुंदर आहे. त्यात लेखकाची बहुश्रुतता दिसते. प्रतिभासृष्टी संपन्न व समृद्ध आहे. कल्पनाविलास व विविध अलंकाराची योजना त्यात आहे. मराठीचा गौरव या शब्दांत केला आहे.

‘धुळी आंतील रत्न । जरि भेटे न करिता प्रेत्न ।
तरी चतुरी येत्न । का न करावा ।’

‘ मराठी भाषेतल्या वेषातला शांकरमठातला सुबोध वेदान्त पाठ ’ म्हणजे विवेकसिंधु असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्री जोशी यांनी म्हटले आहे."

“शके अकरा दाहोत्तरू | साधारण संवत्सररू |
राजा शारंगधरू | राज्य करी ||
ऐसा समयो सर्वोत्तमू || तेथ मुकुंद द्विजोत्तमू |
विवेकसिंधू मनोरमू निर्मित झाला||
“शंकरोक्तीवरी | माझी बोलली वैखरी |
म्हणोनि धरावी चतुरी | शास्त्रबुद्धि ||४७||
अहो युक्तिचेनि प्रसंगे | शास्त्राते म्हणती उगे |
तरी माझे बोल वाउगे | का होतील पां ||४८||
जैसे आपुलेनि पवित्रपणे | लक्ष्मीयेसी आणीले उणे |

म्हणोनि मस्तकी नारायेणे |तुळशी वंदीली ||४९||

ह्या बोबडेया बोला |श्री चंद्रचूड संतोखला |
मग सौरसु केला | ग्रंथ निर्माणी ||१||
वेदशास्त्रांचा मथितार्थु | मऱ्हाटिया जोडे फलितार्थु |
तरि चतुरी परमार्थु | का नेघावा ||२||
हो का वक्ता नवरसांचा | जऱ्हि चतुर अपाडाचा |
तथापि लाभु परमार्थाचा | तया दुर्लभुच कीं ||९||
जेथ ब्रह्मरसाची गोडी | अखंड अनुभविजे रोकडी |
तेया बोलाची आवडी | साधू जनांसि ||१३||
म्हणौनि विवेकसिंधू येणें नांवें | ग्रंथु कीजैल स्वानुभवे ||१४||
भाषा हो का मऱ्हाटी | परि उपनिषदाचीच राहाटी |
तेथिंचा अर्थु जीवाचिये गांठी | कां न बांधावा ||१७||
येचि देहीं येचि डोळां | भोगिजे मुक्तीचा सोहळा |
तऱ्हि वैराग्याचिया तातवेळा | कां सिणावें ||२०||

## २) नरेंद्र - (१२१४)

हे रामदेवराव यादवांच्या दरबारातील एक कवी होत. त्यांनी पुढे राजाश्रय सोडला आणि महानुभाव पंथाची दीक्षा घेतली. 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्यात निसर्ग वर्णन, अलंकारवैभव, रसोत्कटता, भक्ती, कल्पनाचातुर्य वगैरे गुण आढळतात. हे स्वयंवरकाव्य असल्याने त्यात शृंगाराला साहजिकच महत्व आहे. या काव्याच्या १८०० ते २९३४ ओव्यांच्या हस्तलिखित पोथ्या सापडतात; परंतु पहिल्या ८७९ ओव्याच महानुभाव लोकांना मान्य आहेत. या काव्याचा रचनाकाल १२१३-१४ हा आहे.

ऐसे आदि-कवीचे बोल :

अमृतापासौनि बहुये रसाळ
तया रस - कवींचे शब्द : चंद्र - कलेसी बोलती ब्रीद
ते आइकतां निगे दोंद : क्षीर - सागरासी ||१||
कुंकुमाची वेलि लांबी : तिया मुक्ताफळांचिया तुरंबी
तैसिया अक्षरांचिया लोंबी : कविता - लते ||२||
प्रबंधिचा झळके परिमळु : तेथ खांचनां होय मळयानिळु
सराड दे पदाचा ढाळु : कामिनीं - कटाक्षांसी ||३||
साहित्य -सेवंतियांचा घाटौलीं : जे ग्रंथ - देवते वाति लाखोली
विणेया पासौनि तयांचा बोलीं : वोता रंगु दिसे ||४||
उन्मेख चंद्राचां तुषारीं : कथा कापुरकेळीचां उदरीं
प्रमयांचा पोतास कवणे परी : निफजे जाणांलागी ||५||

संध्यारजनी -

तवं उचित - चंद्रिका म्हणे : "सूर्या अस्ताचळीं होत उपेणें
जैसे तेजाचें सांटवतें वोपणें : मढीं पवळेयाचां ||१||
कीं कुंकुम - वनीं सरागू : झेंपावत शृंघार - विहिंगू
कीं त्रिनेत्रें तातला अनंगू : रिगत पश्चम - समुद्रीं ||२||
कीं ठेविला प्रकाशाचा मुडा : पाताळीं पेणें होत गरुडा
कीं श्रीकृष्णु आर्घिला पश्चमिलीं कडां : कमळ कांतिचेनि ||३||
कीं संध्या - सरोवरी सारासिचा गिवसू : करूं आला सोनेयाचा सारसू
तैसा सूर्या होताय प्रवेशु : अस्ताचेळीं ||४||

तेथ फुटले इंद्रनिळाचे बोरे : तैसा माथा उधविला आंधारे
कीं डोंगर उन्मळीले गरुडोद्वारें : पाचिचे हे ||५||

## वारकरी पंथ - संकल्पना -

"पंढरीच्या वारीची ही प्रथा बरीच जुनी आहे. विठ्ठलाला नावारूपाला आणणाऱ्या पुंडलीकानेच पंढरीच्या वारी संप्रदाय सुरु केला असावा."
पंढरीची वारी करणे म्हणजे  वर्षातून दोनदा आषाढी, कार्तिकी एकादशीला किंवा महिन्यातील एका एकादशीला पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेणे. पापक्षालनार्थ तीर्थयात्र करतात. पण पापक्षालन हे वारीचे उद्दिष्ट नाही. किंबहुना वारकरी पंथाने कोणत्याच नकारात्मक भावनेला आपल्या पंथात थारा दिला नाही. देवताभक्तीत समन्वय करताना वारकरी पंथाची जी सकारात्मक भूमिका होती तीच सकारात्मक भूमिका वारीच्यामागे सुद्धा आहे.
" वारकरी पंथ हा जरी श्री ज्ञानदेव व नामदेव या जोडीच्या काळाच्या पूर्वी होता, तरी त्याचे कार्य या दृष्टीने त्याचा आरंभ या जोडीच्या काळातच झाला ही गोष्ट निर्विवाद आहे." तसेच "श्री ज्ञानदेवांनी या विखुरलेल्या वारकरी भक्तांची आपल्या सामर्थ्याने संघटना केली आणि ज्ञानदेवी लिहून या पंथास सुव्यवस्थिता आणली." व शतकानुशतकांच्या अवहेलनेचे मूढ आणि मूक बनलेल्या बहुजन समाजाला त्यांची भाषा दिली.
परमेश्वर एक आहे. तो सर्वांच्या अंत:करणात आहे. त्याचे स्वरूप प्रेममय आहे. तो निर्गुण निराकार आहे, परंतु भक्तांच्यासाठी तो सगुण साकार झाला आहे. त्याची भक्ति कोणीही करावी.
नाम घेण्यास सोवळे-ओवळे, जात-पात, उच्च-नीच, वर्ण-लिंग यांचे बंधन नाही. नाम कोणीही, कोठेही, केव्हाही घ्यावे."

### 3) महदंबा - (१२३३-१३०८)

मराठीतली पहिली कवयित्री. चक्रधर स्वामींची शिष्या. साहित्य - 'धवळे' (धवलयशोगानाच्या कविता), 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर', 'गर्भारकांड'- ओव्या लग्नाच्या प्रसंगी वराला उद्देशून म्हणावयाची ही गीते आहेत. 'धवळा' हा एक वृत्तप्रकार असावा. भावनेची उत्कटता व आत्मपरता या दृष्टीने अर्वाचीन काळातील भावगीतासारखे या गीतांचे स्वरूप आहे. त्यांची भाषा व त्यांतील भावमाधुरी स्त्रीसहज अशी आहे. श्रीकृष्णरुक्मिणीविवाह विषयक ही मराठीतील पहिली रचना होय.

कृष्ण-रुक्मिणीची वरात -

"गुढीया-तोरणे द्वारके निच उछ्छाचो :
वीशेषें श्रीरखमीणीं प्रणूनि आले श्रीकृष्णरावो :
कुंकुमाचे सडे मुक्तिचौक तोरणें मखर :
द्वारका नव्हे ब्रह्मविद्यातेजें चराचर ||४||
जालें अस्तमान मीमकें केली मूळरचना :
श्रींगार करूनि दांडीया चढलीया अंगना :
यादव अरूढ गज-वारीकां छत्रां-सीरीगीरीयां बंबाळू दीवीयां नाहीं अंतु:
वाद्यंत्राचा घोषनाद नारद - तुंबर गीतीं गोवींद आईकि (वि) तु:
||५||
देववृंदे ऋषीवृंदे गीतमंत्रध्वनी
वाजत-गाजत आले जेथ रावो श्रीचक्रपाणी :
वऱ्हाडीया पाये प्रक्षाळूनी पुस्पा तांबोला (सन्मान केला) :
भीमकीचिये माते कुंकुम-कस्तुरी लावीती तीया बाळा ||६||
जातिजुती पाने पोफळी परीएळी पाटोळी :
भीमकीचीये मातेसी उचलणी केली:
मुगतां-माणीकांचे दांडे गोमेद पद्मराग माणिके उधांती :
श्रींगार श्रीकृष्णां -रखमाणीये देऊनी मुगटीं ओळगाविती ||७||
वऱ्हाड चालीलें नगराभीतरी :
गुढरी अरूढ श्रीयेसहीत मुरारी :
चवरें वरी कनकदंडे सीरीगीरीं छत्रां नाही सेवो :
द्वारकेची रचना देखूनी नीऱ्हां विस्मति भिमकरावो: ||८||

## ४) संत सावता माळी - (१२५०-१२९५)



"आमुची माळियाची जात शेत लाऊ बागायती " असे अभिमानाने सांगणारे श्री.संत सावता माळी यांची जीवन दृष्टी पुरोगामी होती. महाराजांचे वैशिष्ठ्य म्हणजे त्यांनी जीवनात कधीही पंढरीची वारी केली नव्हती. याद्वारे ते संदेश देऊ इच्छिता की "जीवन निर्वाहाची कामे करता करता ईश्वर भक्ती पण केली जाऊ शकते" "एकवेळ विठ्ठलाचे दर्शन दुरावले तरी चालेल पण स्वकर्मापासून विचलित होऊ नये हा विचार प्रत्यक्ष विठ्ठलानेच शिकवला आहे"

कांदा मुळा भाजी | अवघी विठाबाई माझी ||
लसूण मिरची कोथिंबीर | अवघा झाला माझा हरी ||
मोट नाडा विहीर दोरी | अवघी व्यापिली पंढरी ||
सांवता म्हणे केला मळा | विठ्ठलपायी गोविला गळा ||
आमुची माळियाची जात | शेत लाऊ बागाईत ||
आम्हा हाती मोठ नाडा | पाणी जाते फुल झाडा ||
शांती शेवंती फुलली | प्रेम जाई-जुई व्याली ||
सावताने केला मळा | विठ्ठल देखियेला मळा ||

## ५) संत गोरा कुंभार - (१२६७-१३१७)



गोरा कुंभार हे आध्यत्मिकदृष्ट्या संतपदाला पोहोचलेले होते, पंढरपूरच्या विठ्ठलाचे ते अनन्यसाधारण भक्त होते. गोराबा हे संत मंडळींमध्ये वयाने सर्वांहून वडील होते. त्यांना सर्व जण गोरोबाकाका म्हणत असत.

संत गोरोबांचे सुमारे वीस अभंग सकलसंतगाथेत समाविष्ट केलेले आहेत.

१. अंतरीचे गुज बोलू ऐसे काही
२. एकमेकामाजी भाव एकविध
३. कवण स्तुति कवणिया वाचे
४. काया वाचा मन एकविथ करी
५. कासयासी बहू घालसी मळण
६. केशवाच्या भेटी लागलेसे पीस
७. कैसे बोलणे कैसे चालणे
८. जो आवडी निर्गुणाचा संग धरिला
९. जोहरियाचे पुढे ठेवियले रत्ना
१०. देवा तुझा मी कुंभार
११. नामा ऐसे नाम तुझिया स्वरूपा
१२. निर्गुण रूपडे सगुणाचे बुंथी
१३. निर्गुणांचे भेटी आलो सगुणासंगे
१४. ब्रहम मूर्तिमंत जगी अवतरले
१५. मुकिया साखर चाखाया दिधली

१६. रोहिदासा शिवराईसाठी
१७. वंदावे कवानासी निंदावे कवनासी
१८. श्रवणे नयन जिव्हा शुद्ध करी
१९. सरितेचा ओघ सागरी आटला
२०. स्थूळ होते ते सूक्ष्म पै जहाले

१) निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे ।
तंव झालों प्रसंगी गुणातीत ॥१॥
मज रूप नाहीं नांव सांगू काई ।
झाला बाई काई बोलूं नये ॥२॥
बोलतां आपली जिव्हा पैं खादली ।
खेचरी लागली पाहतां पाहतां ॥३॥
म्हणे गोरा कुंभार नाम्या तुझी भेटी ।
सुखासुखीं मिठी पडली कैसी ॥४॥

२) मज रूप नाहीं नांव सांगू काई ।
झाला बाई काई बोलूं नये ॥२॥
बोलतां आपली जिव्हा पैं खादली ।
खेचरी लागली पाहतां पाहतां ॥३॥
म्हणे गोरा कुंभार नाम्या तुझी भेटी ।
सुखासुखीं मिठी पडली कैसी ॥४॥

३) मुकिया साखर चाखाया दिधली |
बोलताही बोली बोलवेना ||
तो काय शब्द खुंटला संवाद |
आपुला आनंद अवधाराया ||
आनंदी आनंद मिळोनी राहणे |
अखंडित होणे नहोनिया ||
म्हणे गोरा कुंभार जीवनमुक्त होणे |
जग हे करणे शाहणे बापा ||

## ६) संत नामदेव – (१२७०-१३५०)



महाराष्ट्रातील संत कवींचे अग्रणी. हे ज्ञानेश्वरांचे समकालीन. ह्यांनी मराठी प्रमाणेच हिंदीतही रचना केल्या. शिखांच्या गुरु ग्रंथसाहिबमधे त्यांची ६१ पदे समाविष्ट केली गेली आहेत. काही काळ पंजाबात राहिले असावेत.

वारकरी संप्रदायामध्ये संत नामदेव हे विठ्ठलाचे निस्सीम भक्त म्हणुन लोकप्रिय होते. अत्युत्कट भक्तिप्रेमाने ओथंबलेली अभंगराचना त्यांनी केली. या भक्तिभावाच्या जोरावर त्यांनी ज्ञानदेवांचे व समकालीन संतमंडळींचे प्रेम जिंकले. नामदेवांची सर्व रचना स्फुट अभंगाची आहे.

आपल्याकडे भावकविता हा शब्दप्रयोग, आधुनिक कवितेच्या संदर्भात मुख्यत: वापरला जातो. परंतु याचा अर्थ असा नाही की पुर्वी भावकविताच नव्हती. संतांच्या काव्यात ओवी, अभंग, गौळणी, पदे, लोकगीते, विराण्या, पाळणे, भूपाळ्या, लावण्या अशा विविध स्वरुपात भावकविताच अविष्कृत झालेली आहे. अशी विशुद्ध भावकविता लिहिणारे संत कवी म्हणून संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत गोरा कुंभार, संत एकनाथ, संत चोखामेळा, समर्थ रामदास इत्यादी सर्वच संतांचा उल्लेख करायलाच हवा.

अभंग :

१) डोळे शिणले पाहता वाटुली | अवस्था दाटली हृदयामाजी |
तू माझी जननी सरसीये सांगातिणी | विठ्ठले धावोनी घेई क्षेम ||
२) तू अवकाश मी भूमिका | तू लिंग मी साळुंका |
तू समुद्र मी द्वारका | स्वये दोन्ही ||
३) माझे मागणे ते किती | दाता लक्ष्मीचा पति |

मेघ वर्षे शिळाधारी | तेथे चातक चंचु भरी ||
४) अमृताहूनि गोड नाम तुझे देवा | मन माझे केशवा का बा नेघे ||
५) तुझिया सत्तेने वेदासी बोलणे | सूर्यासी चालणे तुझिया बळे ||
६) चक्रवाक पक्षी वियोगे बहाती | झाले मजप्रती तैसे आता ||
चुकलिया माय बालके रडती | झाले मजप्रती तैसे आता ||
७) देह जावो अथवा राहो | पांडुरंगी दृढ भावो ||

पतीतपावन नाम ऐकुनी आलो मी द्वारा | पतीतपावन नव्हेसि म्हणुनी जातो माघारा ||१||

घ्यावे तेव्हा द्यावे ऐसा अससी उदार | काय धरुनी देवा तुझे कृपणाचे द्वार ||२||

सोडी ब्रीद देवा आता नव्हेसि अभिमानी | पतीतपावन नाम तुझे ठेवियले कोणी ||३||

झेंगट घेऊनि हाती दवंडी पिटीत तिन्ही लोकी | पतीतपावन देवा परी तू मोठा घातकी ||४||

नामा म्हणे देवा तुझे न लगे मज कांही | प्रेम असोदे चित्ती म्हणुनि लागतसे पायी ||५||

आउ कलंदर केसवा ...... संत नामदेव (पंजाबी अभंग)

आउ कलंदर केसवा करी अबदाली भेसवा
जिनि अकास कुलह सिरी कीनी कउसै सपत पयाला
चमर पोस का मंदरु तेरा इह बिधि बने गोपाला
छपन कोटि का पेहनू तेरा सोलह सहस इजारा
भार अठारह मुदगरू तेरा सहनक सभ संसारा
देहि महजिदी मनु मौलाना सहज निवाज गुजारै
बीबी कौला सउ काइनु तेरा निरंकार अकारै
भगती करत मेरे ताल छिनाए किह पहि करउ पुकारै
नामे का सुआमी अंतरजामी फिरे सगल बेदेसवा

श्री ज्ञानदेवांच्या समाधीचे अभंग.

ज्या दिवशी श्री ज्ञानदेवांनी समाधि घेतली त्यादिवशी नक्की काय घडले असेल याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात असणार !

या प्रसंगी प्रत्यक्ष नामदेवांची उपस्थिती होती. हा सोहोळा आदराच्या, भक्तिच्या, प्रीतीच्या, सख्यत्वाच्या, अनंत नात्यांनी नामदेवांनी पाहिला; अनुभविला ! त्यांचे धावते, जिवंत चित्रण त्यांनी बारीक सारीक तपशिलांसह काढलेले आहे. धावत्या शब्दचित्रवाणीचा हा उत्तम नमुना ठरावा. एकूण २४ अभंग. त्यातले शेवटचे पांच अभंग येथे देत आहे.

२०

सर्व स्वस्ति क्षेम वैष्णव मंडळी। बैसलेती पाळी समाधीच्या ॥१॥ पताकांची छाया दुणावली फार। सिद्ध ज्ञानेश्वर तेव्हां झाले ॥२॥ अजानवृक्षदंड आरोग्य अपार। समाधीसमोर स्थापियेला ॥३॥ कोरड्या काष्ठी फुटियेला पाला। तेव्हां अवघियाला नमस्कारी ॥४॥ नामा म्हणे देवा घार गेली उडोन। बाळें दानादान पडियेली ॥५॥

२१

परसा भागवतें केला नमस्कार। सारे लहान थोर जमा झाले ॥१॥ सकळांचिया पायीं नमियेलें नमना। केली प्रदक्षिणा समाधीसी ॥२॥ प्रथम पायरी बाहेरील जेथें। उभा पंढरिनाथ भेटावया ॥३॥ देव ह्मणे बापा अमृत नेदी पाट। फार केले कष्ट जगासाठीं ॥४॥ नामा म्हणे यांनीं अनुभवाच्या नौका। पार केलें लोकां जडमूढां ॥५॥

२२

देव निवृत्ति यांनीं धरिले दोन्ही कर। जातो ज्ञानेश्वर बैसावया ॥१॥ नदीचिया माशा घातलें माजवण। तैसे जनवन कालवलें ॥२॥ दाही दिशा धुंद उदयास्तावीण। तैसेंचीं गगन कालवलें ॥३॥ जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी। पुढें ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥४॥ ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा। पादपद्मी ठेवां निरंतर ॥५॥ तीन वेळां तेव्हां जोडिलें करकमळ। झांकियेले डोळे ज्ञानदेवें ॥६॥ भीममुद्रा डोळा निरंजन मैदान। झाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव ॥७॥ नामा म्हणे आता लोपला दिनकर। बाप ज्ञानेश्वर समाधिस्त ॥८॥

२३

निवृत्तीनें बाहेर आणिलें गोपाळा । घातियेली शिळा समाधीसी ॥१॥ सोपान मुक्ताई सांडिती शरीरा । म्हणती धरा धरा निवृत्तीसी ॥२॥ आणिकांचीं तेथें उद्विग्न तीं मनें । घालिताती सुमनें समाधीसी ॥३॥ नामदेवें भावें केली असे पूजा । बापा ज्ञानराजा पुण्यपुरुषा ॥४॥

२४

अवधीं जयजयकारें पिटियेली टाळी । उठली मंडळी वैष्णवांची ॥१॥ सह मंडळी सारे उठले ऋषीश्वर । केला नमस्कार समाधीसी ॥२॥ पंचद्वारें संत रिघाले बाहेर । सखा ज्ञानेश्वर अलंकापुरीं ॥३॥ इंद्रायणी केलें अवघ्यांही आचमन । करिती समाधान निवृत्तीचें ॥४॥ सोपानासी पोटीं धरिलें देवानें । संवत्सरगांवीं जाणें नेम केला ॥५॥ मुक्ताबाईलागीं सांगितली खूण । जाय तो सोपान स्थीर असा ॥६॥ त्रिवर्ग तीं ऐसीं राहिलीं एकमनें । जाणोनियां खूण नामा ह्मणे ॥७॥

◇ ◇

## ७) संत निवृत्तिनाथ - (१२७३-१२९८)

नाथ संप्रदायातील गहिनीनाथांनी निवृत्तिनाथांना दीक्षा दिली.

ज्ञानेश्वर, सोपानदेव मुक्ताई, निवृत्तिनाथ ह्या चार भावंडांमधे निवृत्तिनाथ हे थोरले होते. निवृनाथ हे ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू आणि गुरू होते. निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वरांना संस्कृतमध्ये असणारी गीता सामान्य लोकांना उमजेल अशा शब्दांत लिहिण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका(ज्ञानेश्वरी) लिहून काढली.

१) आम्ही चकोर हरि चंद्रमा | आम्ही कला तो पूर्णिमा |
कैसा वाहिजु भीतरी हरि | बिंबे बिंबला एकसूत्री |
आम्ही देहि तो आत्मा | आम्ही विदेशी तो परमात्मा |
ऐक्यपणे सकळ वसे | द्‌वैत बुद्धी काही न दिसे |
निवृत्ती चातक इच्छी पा हे | हरिलागी वरते पाहे |

२) जेथे पाहे तेथे व्यापिले अनंते |
तयाविण रिते कोण ठाय ||
गगनेवीण ठावो नाही जैसा रिता |
तैसा या अच्युताविणे काही ||
तेथे माझ्या चित्ता करी राहिवासु |
न नकरी उदासु ऐसियाते ||
निवृत्तीने मन ठेविले चरणी |
नामाची निशाणी अखंडीत ||

## ८) संत ज्ञानेश्वर - (१२७५-१२९६) ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी, आळंदी.



भावार्थदीपिका ऊर्फ ज्ञानेश्वरी ही भगवद्गीतेवरील टीका आहे. इ.स. १२९०. ओवीसंख्या सुमारे नऊ हजार आहे. त्याची रचना नेवासे येथी झाली, हा उल्लेख त्या ग्रंथातच आहे. पुढे त्यात अनेक अपपाठ शिरले म्हणून एकनाथांनी त्याची शुद्ध प्रत तयार केली (१५८४).

इतर साहित्यरचना अमृतानुभव, अनेक अभंग.

राजहंसाचे चालणे | भूतळी जालिया शाहाणे |
आणिक काय कोणें | चालावेंचिना ||२१||
जी आपुलेनि अवकाशे | अगाध जळ घेपे कलशे |
चुळीं चूळपणा ऐसे | भरुनि न निघे ||२२||
दिवियेचा आंगी थोरी | तरी ते बहु तेज धरी |
वाती आपुलिया परी | आणीच की ना ||२३||
जी समुद्राचेनि पैसे | समुद्री आकाश आभासे |
थिल्लरी थिल्लराऐसे | बिंबेची पै ||२४||
तेवी व्यासादिक महामती | वावतो येती इये ग्रंथी |
मा आम्ही ठाको हे युक्ती | न मिले कीर ||२५||
जिथे सागरी जळचरे | संचरती मंदराकारे |
तेथ देखो शफरे येरे | पोहो लाहती ||२६||
अरुण आंगाजवळिके | म्हणौनी सूर्याते देखे |
या भूताळींची न देखे | मुंगी काई ||२७||
या लागी आम्हा प्राकृता | देशिकारे बंधे गीता |
म्हणणे हे अनुचिता | कारण नोहे ||२८||

आणि बापु पुढा जाये | ते घेत पाउलाची सोये |
बाळ ये तरी न लाहे | पावो कायी ||२९||
तैसा व्यासाचा मागोवा घेतु | भाष्यकाराते वाट पुसतु |
अयोग्यही मी न पावतु | के जाईन ||३०||

“माझा मऱ्हाटा चि बोलु कवतिके |
परि अमृताते ही पैजेसी जीके
ऐसी अक्षरे चि रसिके मेलवीन ||१४||
जिये कोवलिकेचेनि पाडे दीसति नादिचे तरंग थोकडे |
वेधे परिमलाचे बीक मोडे | जेयाचेनि ||१५||
आइका रमालपणाचेया लोभा |
कि श्रवणि चि होयि जीभा बोले
इंद्रिया लागे कलभा | येकमेका ||१६||
साहाजे शब्दु तरि विषो बोले श्रवणाचा |
परि रसना म्हणे का रसु चि आमुचा |
घ्राणासि भावो जाये परिमलाचा |
हा ती चि का होईल ||१७||
नवल बोलतिये रेखेची वाहाणि |
दाविता डोलेया ही पुरो लागे आणि |
ते म्हणति उघडिली का खाणी |
रूपांची हे ||१८||
जेथे संपूर्ण पद उभारे तेथ मन चि धावे बाहेरि |
बोलुभुजाही आशे भरे | आलिंगावेया ||१९||
ऐसा इंद्रिये आपुलाला भावि |
झोंबता परि तो सरिसेपणे चि बुझावी |
जैसा एकला जग घेववी | सहस्रकरू ||२०||

संत ज्ञानेश्वरांचे अभंग - (सर्व परिचित असल्यामुळे फक्त सुरुवातीच्या ओळीच देत आहे)

१) घनु वाजे घुणघुणा | वारा वाहे रुणझुणा ||
२) पैल तो गे काऊ कोकताहे | शकून गे माये सांगताहे ||

४) इवलेसे रोप लावियले द्वारी | त्याचा वेलू गेला गगनावरी ||
५) अवघाची संसार सुखाचा करीन
६) अवचिता परिमळू
७) आजि सोनियाचा दिनु
८) जाणीव नेणीव भगवंता
९) दिन तैसी रजनी
१०) पांडुरंगकांती दिव्य तेज
११) मोगरा फुलाला
१२) रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा
१३) रूप पाहता लोचनी
१४) विश्वाचे आर्त
१५) समाधी साधन संजीवन
१६) ॐ नमोजी आद्या

पसायदान हे श्रेष्ठ असे विश्वगीत किंवा मानवधर्म गीत आहे.

आतां विश्वात्मके देवें | येणे वाग्यज्ञे तोषावें |
तोषोनि मज द्यावे | पसायदान हे ||१||
जे खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रति वाढो |
भूतां परस्परे जडो | मैत्र जिवाचे ||२||
दुरितांचे तिमिर जावो | विश्व स्वधर्म पाहो |
जो जें वांछील तो ते लाहो | प्राणिजात ||३||
वर्षत सकाळ मंगळी | ईश्वरनिष्ठांची मांदियाळी |
अनवरत भूमंडळी | भेटतु भूतां ||४||
चलां कल्पतरुंचे अरव | चेतना चिंतामणीचे गांव |
बोलते जे अर्णव | पीयूषाचे ||५||
चंद्रमेजे जे अलांछन | मार्तंड जे तापहीन |
ते सर्वही सदा सज्जन | सोयरे होतु ||६||
किंबहुना सर्वसुखी | पूर्ण होऊनी तीही लोकी |
भाजिजो आदिपुरुखी | अखंडीत ||७||

(पसाय = प्रसाद, खळांची = दुष्टांची, व्यंकटी = मनाचा वाकडेपण, दुष्टपणा, सांडो = नष्ट होवो, अनवरत = अखंड, मांदियाळी = गर्दी, अर्णव = समुद्र, पीयूष = अमृत, मार्तंड = सूर्य.)

अर्थ :-

१) दुर्जनांचे दुष्ट विचार जाऊन त्यांच्या ठिकाणी सत्कृत्यांविषयी आवड निर्माण व्हावी.

२) सर्व प्रणिमात्रांची परस्परांशी मैत्री जडावी.

३) पापाचा अंधार नाहीसा होऊन जगात स्वधर्मसूर्याची पहाट उजाडावी. (म्हणजे प्रत्येकाला आपल्या कर्तव्यकर्माची जाणीव व्हावी.)

४) प्रत्येक प्राणिमात्राला त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व काही लाभावे.

५) जगातील सर्व माणसांना ईश्वरनिष्ठ संत सदैव भेटावे.

६) सर्व माणसांनी सज्जनांशी नाते जोडावे.

७) त्रैलोक्यातील सर्वजण सुखी होऊन त्यांनी आदिपुरुषाची (परब्रह्म परमात्म्याची) अविरत भक्ती करावी. [याहून अधिक काय मागायचे?]

अभ्यासकांच्या मते ८वी ओवी - "आणि ग्रंथोपजीविये । विशेषे लोकी इये । दृष्टादृष्ट विजये । होवावे जी ॥८॥" - ही ओवी प्रक्षिप्त (नंतर टाकलेली) आहे. ती ज्ञानेश्वरांनी लिहिली असेल असे वाटत नाही. " त्रैलोक्यातील सर्वजण सुखी" व्हावेत म्हंटल्यानंतर काही मागायचे शिल्लक राहत नाही. - य. ना. वालावलकर

अमृतानुभव (अनुभवअमृत) इ. स. १२९२

अद्वैताचा अनुभव हाच ज्याचा एकमेव विषय आहे, असा अमृतानुभव हा सुमारे आठशे ओव्यांचा स्वतंत्र ग्रंथ (हा अनुभवामृत ह्या नावानेही ओळखला जातो.) काव्य आणि तत्वज्ञान या दोन्हीं दृष्टींनी हा ज्ञानेश्वरीच्याही वरची पातळी गाठतो असा रसिकांचा व तत्ववेत्त्यांचा अभिप्राय आहे.

अमृतानुभवमधे १० अध्याय आहेत. ते असे :- मंगलाचरण

१) शिवशक्तिसमावेशन २) श्रीगुरुस्तवन ३) वाचाऋणपरिहार ४) ज्ञानाज्ञानभेदकथन

५) सच्चिदानंदपदत्रयविवरण ६) शब्दखंडन ७) अज्ञानखंडन ८) ज्ञानखंडन ९) जीवनमुक्तदशाकथन

१०) ग्रंथपरिहार

"आणि ज्ञान हे जे म्हणिजे | ते अज्ञानचि पाहुजे |
येक लपवूनि दाविजे | एक नव्हे ||६||

(अर्थ : शिवाय ज्ञान असे ज्याला म्हणतात, ते तरी दुसरे अज्ञानच की ! एक लपवून एक दाखवावे, अशाच प्रकारचे नव्हे काय ?)

"आणि अज्ञान म्हणणे | स्फुरतसे अर्थपणे |
आता हेचि ज्ञान कोणे | मानिजे ना || २७९||

(अर्थ : इतक्याही उपर अज्ञान म्हणणे हे अर्थरूपाने स्फुरतच असते. मग हे स्फुरणारे ज्ञान आहे, असे हे का मानीत नाहीत ?)
अशा तऱ्हेने अनेक उपमा देऊन अज्ञान म्हणजे नक्की काय हे सांगितले आहे.
जिज्ञासूंनी 'सार्थ अनुभवामृत लेखक - रा.ना. सराफ किंवा दुसरे कुठचेही पुस्तक वाचावे. ज्ञानदेवांच्या कुशाग्र बुद्धीची झलक पाहायला मिळेल.)

चांगदेव पासष्टी -

योगी चांगदेवांनी कोरे पत्र पाठवले, त्याला उत्तर देण्याच्या निमित्ताने पासष्ट ओव्यांचे एक अद्वैतानुभूतिपर काव्य ज्ञानदेवांनी लिहिले, ते चांगदेवपासष्टी म्हणून प्रसिद्ध आहे.

अथांग आकाशाचे छोटेसे प्रतिबिंब एखाद्या लहानशा जलाशयात पडलेले दिसावे व त्याचा आपल्या मनाला त्या बिंबरूप आकाशाहूनही अधिक मोह पडावा, तशी या चांगदेवपासष्टीतील आविष्काराची गुणवत्ता आहे.

परमाणूचिया मांदिया । पृथ्वीपणें न वचेचि वायां ।
तेंवी विश्वस्फूर्तिं इया । झांकवेना जो ॥ ६ ॥
कळांचेनि पांघुरणें । चंद्रमा हरपों नेणें ।
कां वन्ही दीपपणें । आन नोहे ॥७ ॥
म्हणोनि अविद्यानिमित्तें । दृश्य द्रष्टत्व वर्ते ।
तें मी नेणें आइते । ऐसेंचि असे ॥ ८ ॥
जेंवी नाममात्र लुगडें । येर्हवीं सुतचि तें उघडें ।
कां माती मृद्भांडें । जयापरी ॥ ९ ॥
तेंवी द्रष्टा दृश्य दशे । अतीत द्र्ई~ण्मात्र जें असे ।
तेंचि द्रष्टादृश्यमिसें । केवळ होय ॥ १० ॥

चांगदेवा तुझेनि व्याजें । माउलिया श्रीनिवृत्तिराजे ।
स्वानुभव रसाळ खाजें । दिधलें लोभें ॥ ६१ ॥
एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरिसे ।
परस्पर पाहतां कैसें । मुकले भेदा ॥ ६२ ॥
तियेपरि जो इया । दर्पण करील ओंविया ।
तो आत्माएवढिया । मिळेल सुखा ॥ ६३ ॥
नाहीं तेंचि काय नेणों असें । दिसें तेंचि कैसें नेणों दिसे ।
असें तेंचि नेणों आपैसे । तें कीं होइहे ॥ ६४ ॥
निदेपरौते निदैजणें । जागृति गिळोनि जागणें ।
केलें तैसें जुंफणें । ज्ञानदेवो म्हणे ॥ ६५ ॥

## ९) सोपानदेव -

संत ज्ञानेश्वरांचे कनिष्ठ बंधू. १२९७ साली सासवड येथे समाधी घेतली.

१) ज्या रुपाकारणे उपवास पारणे |
ध्येय ध्यान धारणे ध्याती मौनी ||
ते रूप पंढरी पुंडलिकाचे द्वारी |
ध्याति वेद चारी श्रुतीसहित ||
त्या रूपे वेधले मन माझे मोहिले |
न करी काही केले काय करू ||
सोपान अढळ मन मोहिला गोपाळ |
त्या रूपा वाचाळ जिव्हा झाली ||

२) हरिवीण भावो न धरावा पोटी |
सर्वभावे सृष्टी एका तत्त्वे ||
तत्वत: श्रीहरि सर्वांघटी आहे |
उभारुनि बाहे वेद बोले ||
हरीवीण नाही जीव शिव पाहि |
शिवाच्या हो देही आत्मा हरि ||
सोपान म्हणे हरीवीण नाही तत्त्व |
हरि हाचि सर्वत्र सर्वी वसे ||

## १०) संत मुक्ताबाई - (१२७९-१२९८) मराठी भाषेतील महदंबा, मुक्ताबाई व जनाबाई या समकालीन असून आद्य ज्ञात कवयित्री होत.

संत मुक्ताबाई ह्या संत ज्ञानेश्वरांच्या धाकट्या बहीण म्हणून सर्वांना परिचित आहेत. परंतु त्यांचे स्वतःचेही स्वतंत्र अस्तित्व होते. त्या योगी चांगदेवांच्या गुरू होत. त्यांनी ज्ञानबोध या ग्रंथाचेही लेखन केले आहे.

वेरूळ, घृष्णेश्वर येथे मुक्काम - 'ज्ञानबोध' ग्रंथाची निर्मिती - तापीतीरी स्वरूपाकार झाली. (वैशाख वद्य दशमी) (निवृत्ती आणि मुक्ताबाई ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर तापी नदीच्या यात्रेला गेले. तेथे वादळात मुक्ताबाई पाण्यात वाहून गेली. निवृत्तीनाथांनी त्र्यंबकेश्वरजवळ समाधी घेतली)


ताटीचे अभंग -

"ज्ञानदेव गावात भिक्षेसाठी गेले असताना कोणीतरी त्यांचा मोठा अपमान केला असावा. स्थितप्रद्न्यासारख्या स्थिर आणि शांत वृत्तीचे ज्ञानदेव, पण त्यांचेही मन  विषादाने भरून गेले. मनोमन उद्विग्न होऊन गेलेले ज्ञानदेव परत आले आणि झोपडीचे दार आतून लावून घेऊन एकटेच बसले. आपले दु:ख आपले आपल्याशीच सोसत. किती हाका मारल्या, पण ज्ञानदेव दार उघडेनात. थोरल्या भावाला सावरून घेण्याची ही वेळ आहे, हे मुक्ताईने ओळखले. त्याने झोपडीचे दार उघडावे यासाठी तिने काकुळतीने विनवणी केली. ते हे ताटीचे अभंग."

१) मजवरी कृपा करा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा ||
योगी पावन मनाचा | साही अपराध जनाचा ||
विश्व रागे जाले वन्ही | संतमुखे व्हावे पाणी ||
शब्दशस्त्रे जाले क्लेश | संती मानावा उपदेश ||
विश्वपट ब्रह्म दोरा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा ||१||
संत जेणे व्हावे | जग बोलणे सहावे ||
तरिच अगा थोरपण | ज्या नाही अभिमान ||
थोरपण जेथ वसे | तेथे भूतदया असे ||
रागे भरावे कवणासी | आपण ब्रह्म सर्वदेशी ||
ऐसी समदृष्टी करा | ताटी उघडा ज्ञानेश्वरा ||२||

२)	अवघाचि संसार केला  आम्ही गोड |
झाडे आणि झुड ब्रह्मरूप ||
माता आणि पिता गण आणि गोत |
कन्या आणि सुत ब्रह्मरूप ||
वापी कूप सिंधू आणि सरोवर |
दारे आणि खोरे ब्रह्मरूप ||
हत्ती आणि घोडे बैल आणि रेडे |
मुंगी आणि माकुडे ब्रह्मरूप ||
आनंदाचे लेणे मुक्ताबाई ल्याली |
पालवू लागली चांगयासी ||

## ११) संत जनाबाई –



हिचे अभंग सोपे व साधे असल्यामुळे जास्त लोकप्रिय झाली.
म्हणे नामयाची जनी -

१) डोईचा पदर आला खांद्यावरी | भरल्या बाजारी जाईन मी |
२) येग येग विठाबाई | माझे पंढरीचे आई |
३) विठो माझा लेकुरवाळा | संगे लेकुरांचा मेळा |
४) गंगा गेली सिंधूपासी | त्याणे अव्हेरिले तिसी ||
५) आंधळ्याची काठी | आडकली कवणे बेटी ||
६) पक्षी जाय दिगंतरा | बाळकासी आणि चारा ||

डोईचा पदर आला खांद्यावर | भरल्या बाजारी जाईन मी ||
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा | आता मज मना कोण करी ||
पंढरीच्या पेठे मांडियले पाळ | मनगटावर तेल घाला तुम्ही ||
जनी म्हणे देवा मी झाले थेसवा | रिघाले केशवा घर तुझे ||

येग येग विठाबाई | माझे पंढरीचे आई ||
भीमा आणि चंद्रभागा | तुझे चरणीच्या गंगा ||
इतक्यासहित त्वा बा यावे | माझे रंगणी नाचावे ||
माझा रंग तुझे गुणी | म्हणे नामयाची जनी ||

विठो माझा लेकुरवाळा | संगे लेकुरांचा मेळा ||
निवृत्ती हा खांद्यावरी | सोपानाचा हात करी ||
पुढे चाले ज्ञानेश्वर | मागे मुक्ताई सुंदर ||
गोरा कुंभार मांडिवरी | चोखा जीवा बरोबरी ||
बंका कडेवरी | नामा करांगुली धरी ||
जनी म्हणे गोपाळा | करी भक्तांचा सोहळा ||

## १३) संत चोखामेळा - (१३३८ मृत्यू) जन्मकाल अनिश्चित. अपघाती मृत्यू.



चोखामेळा हे यादव काळातील नामदेवांच्या संतमेळ्यातील वारकरी संतकवी होते.

चोखोबांच्या रचनांत भक्ती, तळमळ, आध्यात्मिक उंची तर दिसेतच, तसेच उपेक्षेची खंत जाणवते आणि 'वेदनेचा जो सूर' लागलेला दिसतो, तो अंतःकरण हेलावून टाकतो.

'आम्हा न कळे ज्ञान न कळे पुराण। वेदांचे वचन न कळे आम्हा।।
चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा। गाईन केशवा नाम तुझे।।'
'जन्मता विटाळ मरता विटाळ। चोखा म्हणे विटाळ आदिअंती।।'
'आदि अंती अवघा, विटाळ साचला। सोवळा तो झाला कोण न कळे।
चोखा म्हणे मज नवल वाटते। विटाळापरते आहे कोण।।'

या रचनांतून उपरोक्त उल्लेख केलेल्या भावभावना दिसतात.

'कर जोडोनिया दोन्ही। चोखा जातो लोटांगणी।।
महाविष्णूचा अवतार। प्राणसखा ज्ञानेश्वर।।'

'ऊस डोंगा परि । रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा।।
चोखा डोंगा परि। भाव नोहे डोंगा।।'
'विठ्ठल विठ्ठल गजरी। अवघी दुमदुमली पंढरी।'

संत बंका (चोखोबांचे मेव्हणे), संत नामदेव आणि संत तुकाराम यांनी त्यांच्या रचनांमध्ये संत चोखोबांबद्दल आपले भाव व्यक्त केले आहेत -

'चोखा चोखट निर्मळ। तया अंगी नाही मळ।।
चोखा प्रेमाचा सागर। चोखा भक्तिचा आगर।।

चोखा प्रेमाची माउली। चोखा कृपेची साऊली।।
चोखा मनाचे मोहन। बंका घाली लोटांगण।।'
(- संत बंका)

'चोखा माझा जीव चोखा माझा भाव। कुलधर्म देव चोखा माझा।।
काय त्याची भक्ति काय त्याची शक्ति। मोही आलो व्यक्ति तयासाठी।।
माझ्या चोखियाचे करिती जे ध्यान। तया कधी विघ्न पडो नदी।।
नामदेवे अस्थि आणिल्या पारखोनी। घेत चक्रपाणी पितांबर।।
(-संत नामदेव)

'तुका म्हणे तुम्ही विचारांचे ग्रंथ। तारिले पतित तेणे किती।।'
-संत तुकाराम

## १४) कान्होपात्रा -



सामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या आणि विठ्ठलभक्तिपर अभंगरचना करणाऱ्या कान्होपात्रा या १५ व्या शतकातील वारकरी संप्रदायातील एक महत्त्वाच्या संत कवयित्री होत्या.. पंढरपूर जवळच्या मंगळवेढा येथे त्यांचे वास्तव्य होते. बिदरच्या बादशहाने मागणी घातली म्हणून कान्होपात्रा यांनी पंढरपूरला विठ्ठलचरणी डोके ठेवून प्राण सोडले.

कान्होपात्रा यांचे फक्त ३३ अभंग 'सकल संत गाथा' या ग्रंथात समाविष्ट झाले आहेत.

कान्होपात्रा यांचे इ.स. १७७७मध्ये बसवलिंग यांनी लिहिलेले एक ओवीबद्ध चरित्र जानेवारी २०१५मध्ये सापडले आहे.

१) पतित तू पावना ।
पतित तू पावना ।म्हणविसी नारायणा ।।१।।
तरि सांभाळी वचन । ब्रीद म्हणविसी जाण ||२||
याती शुद्ध नाही भाव । दुष्ट आचरण स्वभाव ||३||
मुखी नाम नाही । कान्होपात्रा शरण पायी ||४||

२) नको देवराया अंत पाहू आता ।
नको देवराया अंत पाहू आता । प्राण हा सर्वथा फुटो पाहे ||१||
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले । मजलागी जाहले तैसे देवा ||२||
तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी । धावे वो जननी विठाबाई ||३||
मोकलोनी आस जाहले मी उदास । घेई कान्होपात्रेस हृदयात ||४||

३) पतित पावन म्हणविसी आधी

पतित पावन म्हणविसी आधी | तरी का उपाधी भक्तामागे ||१||
तुझे म्हणावीता दुजे अंगसंग | उणेपणा सांग कोणाकडे ||२||
सिंहाचे भातुके जंमबुके पै नेता | थोराचिया माथा लाज वाटे ||३||
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे | करावा जतन ब्रीदासाठी ||४||

## १५) विष्णुदास नामा -

विष्णुदासनामा (सोळावे शतक) हा एक मराठी कवी होता. त्याने महाभारताचे मराठी भाषेत पहिले भाषांतर केले. मराठी काव्याला त्यामुळे कलाटणी मिळाली.
विष्णुदासनामा पंढरपूरचा होता असे मानले जातो. त्याचे काव्य गोव्याच्या परंपरांमध्येही लोकप्रिय आहे.
विष्णुदासनाम्याने लिहिलेल्या प्राकृत महाभारताच्या अठरा पर्वांची ओवीसंख्या सुमारे २०,००० आहे. महाभारताखेरीज विष्णुदासनाम्याने लिहिलेली अन्य स्फुट आख्याने :
समग्र महाभारत मराठीत प्रथमच आणणारे विष्णुदास नामा.

आम्ही न बोलो लटिके | अवघे वर्तमान खोटे |
मुंगी व्याली शिंगी झाली तिचे दुध किती |
अठरा रांजण भरुनि ठेविले प्याले बारा हत्ती |
तळ्यात कासव गीत गाय, तडिवर कोल्हा नाचे |
घेऊनि कागद दौत लेखणी खेकडा पुस्तक वाचे |
विष्णुदास नामा म्हणे ऐका याची ख्याती |
जो लटिके म्हणेल त्याचे पूर्वज नरकी जाती ||

श्री विठोबाची आरती -

येई हो विठ्ठले माझे माऊली ये |
निढळावरी कर ठेवुनी पाह ||
आलिया गेलिया धाडी निरोप |
पंढरपुरी आहे माझा मायबाप ||
पिवळा पितांबर कैसा गगनी झळकला |
गरुडावरि बैसुनी माझा कैवारी आला ||
विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिपवाळी |
विष्णुदास नामा जीवे भावे ओवाळी ||

## १६) संत एकनाथ - (१५३३-१५९९)




"संत एकनाथ हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक सुप्रसिद्ध संत होते. त्यांचा जन्म पैठण येथे झाला.

शांतिब्रह्म, 'संत'पदाला पोहोचलेले सत्पुरुष, उच्च कोटीचे समाजसुधारक, महान तत्त्ववेत्ता, संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक अशा अनेक गुणविशेषणांसह 'ज्ञानाचा एका' या बिरुदावलीने साऱ्या महाराष्ट्राला परिचित असणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे संत एकनाथ. आदर्श गृहस्थाश्रमी, मायमराठीचे सुपुत्र, व्युत्पन्नमति पंडित, दयेचा सागर या शब्दांतही त्यांचे वर्णन करता येईल.

एकनाथांनी गुरूच्या आज्ञेवरून १,०३६ ओव्यांची टीका-चतुःश्लोकी भागवत- लिहिली. ही त्यांची पहिली रचना. त्यांच्या पुढील ग्रंथकर्तृत्वाची चुणूक या पहिल्या रचनेतच दिसून आली. भागवताच्या एकादशस्कंधावर एकनाथांनी लिहिलेली व एकनाथी भागवत या नावाने विख्यात झालेली टीका हा त्यांचा सर्वांत महत्वाचा ग्रंथ होय. हा ग्रंथ सन १५७३ मध्ये काशीत पुरा केला व तेथे विद्वानांना तो मान्य झाल्याने त्याची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली, अशी कथा सांगतात.

ज्ञानेश्वरीच्या प्रतीमध्ये अनेक अपपाठ शिरले होते. एकनाथांनी सन १५८४ मध्ये तिची शुद्ध प्रत सिद्ध केली. मराठी भाषेतील संहितासंशोधनाचा हा पहिलाच प्रयत्न म्हणावा लागेल.

भावार्थरामायण हा नाथांचा चाळीस हजार ओव्यांचा दुसरा प्रदीर्घ ग्रंथ. हा ग्रंथ अपूर्ण असतानाच नाथांनी इहलोकाचा निरोप घेतला आणि गावबा या त्यांच्या शिष्याने अखेरच्या पंधरा हजार ओव्या तंतोतंत त्यांच्या शैलीने लिहून तो पुरा केला.

पदे, अभंग, भारुडे, गौळणी, विराण्या, अशी स्फुट रचनाही नाथांनी केलेली आहे. भारुडे हा प्रकार त्यांच्यामुळेच रूढ झाला. विविध देवता, व्यवसाय, प्राणी, खेळ यांचा या भारुडांमध्ये

त्यांनी कौशल्याने उपयोग करून घेतला आहे. १२५ विषयांवर सु. ३०० भारुडे त्यांनी रचिली आहेत.

त्यांच्या रचना एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर- ७६४ ओव्या. शुकाष्टक (४४७ ओव्या) स्वात्म-सुख (५१० ओव्या), आनंद लहरी (१५४ ओव्या), भारुड (३००) हा नवा प्रकार रूढ केला.

गौळण :

१) कशी जाऊ मी वृंदावना | मुरली वाजवी कान्हा ||धृ.||

२) वारियाने कुंडल हाले | डोळे मोडीत राधा चाले ||धृ.||

भारुड :

३) कृष्ण एक पाखरू आहे | ते मुखावीण चारा खाय रे | डोळे नाही परि ते पाहे |

वाचेवीण स्वये गाय रे ||१||

रोडगा :

४) सत्वर पाव गे मला | भवानीआई रोडगा वाहिन तुला ||१||

पद :

५) ते मन निष्ठुर का केले | जे पूर्ण दयेने भरले ||धृ.||

६) काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल | नांदतो केवळ पांडुरंग |
भाव भक्ति भीमा उदक ते वाहे | बरावा शोभताहे पांडुरंग ||
दया क्षमा शांति हेचि वाळवंट | मिलासे थाट वैष्णवांचा ||
ज्ञान ध्यान पूजा विवेक आनंद | हाचि वेणुनाद शोभतसे |
दश इंद्रियांचा एक मेळा केला | ऐसा गोपाळकाला होत असे ||
देही देखिली पंढरी जनी वनी | एका जनार्दनी वारी करी ||

दत्ताने केले गुरु -

जो जो जयाचा घेतला गुण | तो तो गुरु म्या केला जाण |
गुरूसी आले अपारपण | जग संपूर्ण गुरु दिसे.

## १७) फादर स्टीफन्स - ( १५४९-१६१९)

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात फादर स्टीफन्स या गोव्यातील इंग्रज मिशनऱ्याने मराठीच्या गोमंतकी बोलीचे व्याकरण लिहिले व मराठीत क्रिस्तपुराण सांगितले. स्टीफन्सची मराठी रचना व मराठीवरील त्याचे प्रेम थक्क करणारे आहे.

मराठी भाषेची महती :-

" परमशास्त्र जगी प्रघटावेया | बहुतां जनां फळसिद्धि होवावेया |
भासा बांधोनि मराठिया | कथा निरोपिली ||१२१||
जैसा हरळामाजी रत्नकिळा | कीं रत्नामाजी हिरा निळा |
तैसी भासामाजी चोखाळा | भासा मराठी ||१२२||
जैसी पुस्पांमाजी पुस्प मोगरी | कीं परिमळामाजी कस्तुरी ||
तैसी भासामाजी साजिरी | मराठिया ||१२३||
पखीआंमधे मैओरू | वृखीआमधे कल्पतरू |
भासामधे मानु थोरू | मराठिया ||१२४||
तारांमधे बारा राशी | सप्तवारांमाजीं रवि सशी |
या दिपासाचि भासांमधे तैसी | बोली मराठिया ||१२५||

## १८) संत दासोपंत - (१५५१-१६१५)

दासो दिगंबरपंत देशपांडे ऊर्फ दासोपंत हे मराठी भाषेच्या इतिहासातील सर्वाधिक लेखन करणारे संत-कवी होते. ते संत एकनाथांचे समकालीन होते. दासोपंत दत्तात्रेयांचे परम भक्त होते. यांच्या एकूण रचनांची संख्या सुमारे ५ लाख ओव्यांपर्यंत समजली जाते. त्यांनी काही लिखाण दिगंबरानुचर या टोपणनावाखाली केले आहे.त्यांना संत सर्वज्ञ दासोपंत असेही म्हणतात.

पासोडी -

दासोपंतांच्या वाङ्मय मंदिराचा कळस म्हणजे त्यांची पंचीकरण 'पासोडी' होय. ४० फूट लांब आणि चार फूट रुंद अशा कापडावर पंचीकरण, अध्यात्मज्ञानाचा विषय चित्राकृतींतून मांडलेली ही पासोडी मराठी संतवाङ्मयात अनन्य, अपूर्व व एकमेवाद्‌वितीय अशीच म्हणावी लागेल.

प्राचीन काळी पांघरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जाड्या-भरड्या कापडास पासोडी म्हणत असत. अशा पासोडीवर वेदान्ताचे आकृतीसह स्पष्टीकरण देताना, कपाटाकृती विवरणात्मक मांडणी करताना, कागदाला कागद जोडून लिहिणे गैरसोयीचे व त्याची काळजीपूर्वक हाताळणी करणे व ते दीर्घ काल टिकणे अशक्य व अवघड झाले असते. म्हणूनच पिढ्यान्‌पिढ्या हा अमूल्य विषय अमीट राहावा या उद्देशाने दासोपंतांनी 'कापड' हे वैशिष्टयपूर्ण माध्यम वापरून चित्राकृतीतून अध्यात्मासारखा विषय प्रतिपादन केला.

विषयांची मांडणी करताना त्या अनुषंगाने त्यांनी अश्‍वत्थवृक्ष, सर्प, भावचक्र, पंचकोशचक्र, स्थूलादिदेहचक्र, श्रीदत्तमूर्ती, माला, त्रिशूल, शंख, डमरू, कमंडलू, चक्र व हंस या चित्रांचे रेखाटन केले आहे. दासोपंत एक उत्तम चित्रकार होते याची साक्ष पासोडीतील चित्रांवरून सहजच मिळते.

जोगाईचे आंबे येथे राहणाऱ्या दासो दिगंबर ऊर्फ दासोपंत यांनी संस्कृत-मराठी मिळून सु. ५० ग्रंथ लिहिले आहेत. अनेक देवतांची स्तोत्रे, कवने अशी रचनाही त्यात आहे. प्रचंड रचना हा त्यांचा प्रमुख विशेष. त्यांच्या पदार्णवामध्ये सव्वा लाख पदे आहेत, असे मानले जाते. गीतार्णव ही सव्वा लाख ओव्यांची गीताटीका आहे. एवढी विस्तृत गीताटीका मराठीत दुसरी नाही. गीतार्थबोधचंद्रिका ही सुमारे  ९,००० ओव्यांची दुसरी गीताटीका आहे. ठसठशीत

अक्षरात लिहिलेला पंचीकरण हा त्यांचा ग्रंथ एका अडीच हात रुंद व चोवीस हात लांब पासोडीवर आहे. तो पासोडी म्हणूनच प्रसिद्ध आहे.

दोन्ही डोलुले सजल जलधर जाणवले.
मायबापे सखिये ! हृदय वोळखीले. ||१||धृ.||
दिधले वो आलिंगन; जीवे जीवा येकपण
भेटी भेटणे न दीसे स्वरूप स्थिर पूर्ण ||छ||
भेदू सारुनी, सखिये ! श्रीदत्तु भेटी आला
दिगंबरे भवश्रमु माझा वो! दूरि केला ||२||

## १९) संत मुक्तेश्वर - (१५७४-१६४५) -

कलात्मक निर्मितीची खरीखुरी प्रेरणा ज्याच्या ठायी होती अस मुक्तेश्वर हे एकनाथांचे नातू होत. श्लोकबद्ध संक्षेप रामायण, गरुडगर्वपरिहार, कालिया मर्दन, अहिमहि आख्यान, मूर्खांची लक्षणे, शुकरंभासंवाद आदी त्यांची बरीच रचना असली, तरी मुक्तेश्वरांची प्रसिद्धी त्यांच्या भारती पर्वासाठी आहे. त्यातील आदि, सभा, वन व विराट ही आरंभीची व अखेरच्यांपैकी सौप्तिक अशी पाचच पर्वे उपलब्ध आहेत. कथानिवेदन, प्रसंगवर्णन, व्यक्तिदर्शन यांतील मुक्तेश्वरांचे चातुर्य अव्वल दर्जाचे आहे. शृंगार, वीर व करुण या तीनही रसांचा परमोत्कर्ष त्यांची भारती रचनेत आढळतो. विशेषत: त्यांची युद्धवर्णने व निसर्गवर्णने अप्रतिम आहेत. शृंगारातील उत्तानता व घटनांबाबतचा कालविपऱ्यास हे त्यांचे प्रमुख दोष आहेत. तथापि मुक्तेश्वरी भारताची सर अन्य कोणाही कवीच्या रचनेस येत नाही याबद्दल एकमत आहे.

वर्षाकाळ :

सूर्यकिरण मृगसमुदाय | निस्तेज होऊनी पावले भय |
लपावया शोधीत ठाय | अभ्रे आड करुनिया ||१||
कि पृथ्वीखंड त्या शाळुंखा | अनेक पर्वत शिवपिंडिका |
इंद्रे मांडिले अभिषेका | गगनपात्री बहुधरा ||२||
मयूर चातक कपोतक | दर्दुर करिती महाघोष |
मेघ जगाचा पाळक | सर्व लोकां जाणविती ||३||
विद्युल्लतांचे कडकडाट | घनगर्जना गडगडाट |
गंगादि सरितांचे संघाट | महापूर माजले ||४||
अठराभार वनस्पती | अंकुरवासाने वेढिली जगती |
फळ शाका धान्य संपत्ती | पृथ्वी पिके जगाते ||५||
विष्णु जगाचा प्रतिपाळिता | तोचि मेघ होय तत्वता |
प्रमाण करूनि चंद्र सविता | आपवोपि अयानांशे ||६||
चारी मास दीपदाने | पादुका छत्रे ऊर्णावासाने |
ऋषीश्वरा कुरुभूषणे | अपरिमित वोपिली ||७||
असो वृष्टीकाळ सरला | कार्तिकाचा प्रवेश झाला |
ऋषीसहित धर्म वहिला | काम्यकारण्या पातला ||८||

## २०) श्रीसमर्थ रामदासस्वामी - (१६०५-१६७७)



समर्थ रामदास, जन्म-नाव नारायण सूर्याजी ठोसर हे महाराष्ट्रातील कवी व समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते. रामाला व हनुमंताला उपास्य मानणाऱ्या समर्थ रामदासांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांच्या प्रसारार्थ महाराष्ट्रात प्रबोधन व संघटन केले. ते संत तुकारामांचे समकालीन होते. राजकारण धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होते.

या पुस्तकाचा विषय 'कवी आणि कविता' हा असल्यामुळे कवींविषयी लिहिलेल्या ३४ श्लोकांपैकी काही श्लोक पुढे देत आहे. कवींविषयी इतक्या आत्मीयतेने लिहिलेले क्वचितच आढळेल.

आता वंदू कवीश्वर | जे शब्दसृष्टीचे ईश्वर |
ना तरी हे परमेश्वर | वेदावतारी ||१||

की हे पुरुषार्थाचे वैभव | की हे जगदीश्वराचे महत्व |
नाना लाघवे सत्कीर्तीस्तव | निर्माण कवी ||३||

की हे कल्पनेचे कल्पतरू | की हे मोक्षाचे मुख्य पडीभरु |
नाना सायुज्यतेचे विस्तारू | विस्तारले ||६||

कवि मुमुक्षाचे अंजन | कवि साधकांचे साधन |
कवि सिद्धांचे समाधान | निश्चयात्मक ||१०||

नाना साधनांचे मूळ | कवि नाना प्रयत्नाचे फळ |

नाना कार्यसिद्धी केवळ \ कविचेनि प्रसादे ||१४||

कवि सृष्टीचा अळंकार| कवि लक्ष्मीचा शृंगार |
सकाळ सिद्धींचा निर्धार | ते हे कवी ||१८||

ऐसे पूर्वी थोर थोर | झाले कवीश्वर अपार |
आता आहेत पुढे होणार | नमन त्यासी ||२५||

की हे अमृताचे मेघ वोळले | की हे नवरसाचे वोघ लोटले |
नाना सुखाचे उचंबळले | सरोवर हे ||२८||

आतां असो हा विचार | जगास आधार कवेश्वर |
तयांसी माझा नमस्कार | साष्टांगभावे ||३४||

स्वराज्याच्या उभारणीचे रामदास हे जाणकार साक्षी होते. इतर संतांहून रामदास काहीसे निराळे आहेत आणि त्यामुळे त्यांच्या वाङ्मयाचे रूपही निराळे झालेले आहे.

समर्थांची रचना विपुल आहे. सुंदरकांड आणि युद्धकांड अशी रामायणावरील त्यांची कथापर रचना आहे, पूर्वारंभ, आत्माराम, चतुर्थमान, जुनाट पुरुष अशी काही आध्यात्मिक प्रकरणे त्यांनी लिहिली आहेत. उत्तरवयात लिहिलेल्या परचक्रनिरूपण, अस्मानी सुलतानी; आनंदवनभुवन, क्षात्रधर्म, भवानीस प्रार्थना, आदी छोट्या छोट्या प्रकरणांतून तत्कालीन राजकीय परिस्थितीचे पडसाद उमटले आहेत. त्यांचा सर्वांत महत्वाचा ग्रंथ म्हणजे वीसदशकी आणि दोनशे समासांचा दासबोध. ७,७५१ ओव्यांचा हा ग्रंथ निरनिराळ्या वेळी लिहिलेले समास एकत्र करून सिद्ध झालेला आहे.

त्याच्याही आधी पूर्ववयात लिहिलेल्या करुणाष्टकांमध्ये त्यांच्या मनाची पारमार्थिक जिज्ञासा, वैराग्याची इच्छा आणि ईश्वरदर्शनाची तळमळ प्रकट झाली आहे. ही करुणाष्टके म्हणजे त्यांच्या आर्त मनाचा सहजसुंदर आविष्कार आहे.

महाराष्ट्रात स्वराज्य आले तेव्हा ‘आनंदवनभुवनी’ स्वप्नाची पूर्ती झाल्याचे समाधान प्रकट केले आणि लोकसंग्रहाची व मराठा तितुका मेळवून महाराष्ट्रधर्म वाढविण्याची

आवश्यकता स्पष्ट केली. समर्थांसारखा समाजसन्मुख, ऐहिक वृत्तीचा व रोकडा वास्तववादी संत दुसरा दाखवता येत नाही.

आधी प्रपंच करावा नेटका –

प्रपंच सांडून परमार्थ कराल | तेणे तुम्ही कष्टी व्हाल |
प्रपंच परमार्थ चालवाल | तरी तुम्ही विवेकी ||२||
प्रपंच सांडून परमार्थ केला | तरी अन्न मिळेना खायाला |
मग तया करंट्याला | परमार्थ कैचा ||३||
परमार्थ सांडून प्रपंच करिसी | तरी तू यमयातना भोगिसी |
अंती परम कष्टी होसी | यमयातना भोगीता ||४||
साहेबकामास नाही गेला | गृहीच सुरवाडून बैसला ||
तरी साहेब कुटिती तयाला | पाहाती लोक ||५||

करुणाष्टके –

अनुदिन अनुतापे तापलो रामराया |
परम दिनदयाळा ! नीरसी मोहमाया ||
अचपळ मन माझे नावरे आवरीता |
तुजविण शिण होतो धांव धांव आतां ||१||

भीमरूपी स्तोत्र -

भीमरूपी महारुद्रा, वज्र हनुमान मारुती |
वनारी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना ||१||

आरती शंकराची -

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा |
वीषे कंठकाळा त्रिनेत्री ज्वाळा ||
लावण्यसुंदर मस्तकी बाळा |
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ||१||

सर्व संसार बुडाला -

वेळे पाऊस पडेना | नासकवणी उघडेना ||
ऐसे कुळवाड्याचे भंड | दु:ख जाहले उदंड ||
बहु पडी आले शेत | रेड्यापाड्यांचे आऊत ||
काही केल्याने पिकेना | धान्य वेळेसि विकेना ||
फाळा लाविला उदंड | अवघे जाहले थोतांड ||
वारी रोगांची वाजती | नाना आभाळे फिरती ||
टोळ पक्षी मुषकादिक | खाती श्वापदे अनेक ||
दावेदाराची यातना | चोर चोरटे राहेना ||
नित्य पोटाचा मजूर | वेठीसाठी निघे बूर ||
घर खोपटं मोडके | एक फाटकुर फाटके ||
बरेगाने गुरे गेली | धारणेने मुले मेली ||
सर्व संसार बुडाला | दास म्हणे जोगी जाला ||१||

मनाचे श्लोक -

मना सज्जना भक्तिपंथेचि जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें॥
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें।
जनीं वंद्य ते सर्व भावे करावे॥२॥

प्रभाते मनी राम चिंतीत जावा।
पुढे वैखरी राम आधी वदावा॥
सदाचार हा थोर सांडू नये तो।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो॥३॥

मना वासना दुष्ट कामा न ये रे।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे॥
मना सर्वथा नीति सोडूं नको हो।
मना अंतरीं सार वीचार राहो॥४॥

मना पापसंकल्प सोडूनि द्यावा।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा॥

मना कल्पना ते नको वीषयांची।
विकारे घडे हो जनी सर्व ची ची॥५॥

नको रे मना क्रोध हा खेदकारी।
नको रे मना काम नाना विकारी॥
नको रे मना सर्वदा अंगिकारू।
नको रे मना मत्सरु दंभ भारु॥६॥

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे।
मना बोलणे नीच सोशीत जावें॥
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे।
मना सर्व लोकांसि रे नीववावें॥७॥

## २१) संत तुकाराम - (१६०८-१६५०)



'तुका आभाळा एवढा' - या छोट्याश्या पुस्तकात कसा काय मावणार ?

तुका म्हणे आम्हासवे जो रुसला |
तयाचा अबोला आकाशासी |

परमार्थाची वाटचाल करताना जे अनुभव आले, ते तुकारामांनी या अभंगांमध्ये शब्दबद्ध केले आहेत. 'अंतरीचे धावे स्वभावें बाहेरी' हेच त्यांच्या अभंगांचे योग्य वर्णन आहे. तुकारामांनी बोलण्याचालण्यातील रोजची भाषा संपन्न केली आहे. त्यांचे अनेक उदगार हे मराठी भाषेचे वाक्प्रचार होऊन गेले आहेत. हा खराखुरा जनसामान्यांचा कवी आहे. तुकाराम संत असले तरी वृत्तीने परखड आहेत. जन्मसिद्ध उच्चनीचभाव, विद्वत्तेचा दंभ, कर्मकांडावरील वृथा भर, धार्मिकतेचे ढोंग यांवर त्यांनी कठोर प्रहार केले आहेत. त्यांच्या वाणीत आढळणारी वास्तवाची प्रखर जाणीव हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक विशेष आहे. त्यांची भाषा मेणाहून मऊ होते तशीच प्रसंगवशात ती वज्राहून कठोर होऊ शकते. वारकरी पंथाला आलेले तुकाराम हे अमृतमधुर फूल होय.

अभंगवाणी (हे अभंग सर्व परिचित असल्यामुळे फक्त काही प्रसिद्ध अभंगांच्या ओळी पुढे देत आहे)

१) सुंदर ते ध्यान उभे विटेवरी | कर कटावरी ठेवूनिया ||
२) घेई घेई माझे वाचे | गोड नाम विठोबाचे ||
३) कन्या सासुऱ्यासी जाये | मागे परतोनी पाहे ||
४) भेटीलागी जीवा लागलीसे आस | पाहे रात्रंदिन वाट तुझी ||

५) आपुले मरण पाहिले म्या डोळा | तो जाला सोहोळा अनुपम्य ||
६) आनंदाचे डोही आनंद तरंग | आनंदाचि अंग आनंदाचे ||
७) अनुरणीया थोकडा | तुका आभाळा एवढा ||
८) जेथे जातो तेथे तू माझा सांगाती | चालविसी हाती धरुनिया ||
९) कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता | बहिणी बंधू चुलता कृष्ण माझा ||
१०) वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे | पक्षीही सुस्वरे आळविती ||
११) मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास | कठीण वज्रास भेदू ऐसे ||
१२) जे का रंजले गांजले | त्यासी म्हणे जो आपुले ||
१३) विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेद भ्रम अमंगळ ||
१४) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ||
१५) निवडी वेगळे क्षीर आणि पाणी | राजहंस दोन्ही वेगळाली ||
तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे | येरा गबाळाचे काय काम ||
१६) नाही निर्मळ जीवन | काय करील साबण ||
१७) भले तरी देऊ गांडीची लंगोटी | नाठाळाचे माथा हाणू काठी ||
१८) सुख पाहता जवापाडे | दु:ख पर्वता एवढे ||
१९) अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी | धरिता ही परी आवारे ना ||
२०) हाचि नेम आता न फिरे माघारी ||
२१) शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी ||
२२) आयुष्य वेचुनी कुटुंब पोसिले | काय हित केले सांग बापा ||
२३) दया क्षमा शांती | तेथे देवाची वसती ||
२४) मृदू सबाह्य नवनीत | तैसे सज्जनांचे चित्त ||
२५) दया करणे जे पुत्रासी | ते चि दासा आणि दासी | तो चि भगवंत मूर्ती ||
२६) सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ति |
२७) तू माझी माउली तू माझी साउली |

१) नाही रूप नाही नाव | नाही ठाव धराया |
नाही आकार विकार | चराचर भरलेसे |
नव्हे निर्गुण सगुण | जाणे कोण तयांसी ||

२) आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने | शब्दाचीच शस्त्रे यत्न करू ||

शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन | शब्द वाटू धन जनलोका ||
तुका म्हणे पाहा शब्दचि देव | शब्देचि गौरव पूजा करू ||

३) मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास | कठीण वज्रास भेदू ऐसे ||
मेले जित असो निजोनया जागे | जो जो जे मागे ते ते देऊ ||
भले तरी देऊ गांडीची लंगोटी | नाठाळाचे काठी देऊ माथा ||


४) आवा चालली पंढरपुरा | वेसीपासूनि आली घरा ||
परिसे गे सूनबाई | नको वेचू दूध दही |
उखळ मुसळ जाते | माझे मन गुंतले तेथे |
माझे हातीचा कलवडु |मजवाचुनि नको फोडू |
सून म्हणे बहुत निके | तुम्ही यात्रेसी जावे सुखे |
सवतीचे चाळे खोटे | म्या जावेसे इला वाटे |
मुले लेकरे घरदार |माझे येथेची पंढरपूर |

५) कमोदिनी काय जाणे तो परिमळ ।
भ्रमर सकळ भोगीतसे ॥१॥
तैसें तुज ठावें नाही तुझें नाम ।
आम्ही च तें प्रेमसुख जाणों ॥२॥
माते तृण बाळा दुधाचि ते गोडी ।
ज्याची नये जोडी त्यासी कामा ॥३॥
तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटीं ।
नाही त्याची भेटी भोग तीये ॥४॥

६) जे का रंजले गांजले | त्यासि म्हणे जो आपुले ||
तोचि साधू ओळखावा | देव तेथेचि जाणावा ||
मृदू सबाह्य नवनीत | तैसे सज्जनाचे चित्त ||
ज्यासी आपंगिता नाही | त्यासि धरी जो हृदयी ||
दया करणे जे पुत्रासी | तेचि दासा आणि दासी ||
तुका म्हणे सांगू किती | तोचि भगवंताची मूर्ती ||

## - अद्वैत-पूजा -

कासियाने पूजा करू केशीराजा | हा चि संदेह माझा फेडी आता ||धृ||
उदके न्हाणू तरी स्वरूप ते तुझे | तेथे काय माझे वेचे देवा ||१||
गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ | तेथे मी दुर्बळ काय करू ||२||
फळदाता तूच तांबोल अक्षता | तरी काय आता वाहो तुज ||३||
वाहू दक्षिणा जरी धातु नारायण | ब्रह्म ते चि अन्न दुजे काई ||४||
गाता तू ओंकार टाळी नादेश्वर | नाचावया थार नाही कोठे ||५||
तुका म्हणे मज अवघे तुझे नाम | धूप दीप रामकृष्ण हरि ||६||



श्री संत तुकाराम महाराजांच्या अक्षरात त्यांची गाथा. (खरे-खोटे माहित नाही!) पण त्याकाळी कसे लिहीत असावेत याचा अंदाज येतो.

## २२) वामन पंडित - (१६०८-१६९५)

यथार्थदीपिकाकार वामनपंडित : गीतेचे विद्वान भाष्यकार वामनपंडित हे समर्थांचे समकालीन; पण अगदी निराळ्या प्रकृतीचे ग्रंथकार होत. सतराव्या शतकात तुकाराम, रामदास व वामनपंडित हे तिघे तीन भिन्न प्रवृत्तींचे पण तितकेच कर्तृत्वसंपन्न कवी महाराष्ट्रात होऊन गेले.

यथार्थदीपिका ही बावीस हजार ओव्यांची गीताटीका. हा त्यांचा सर्वांत महत्वाचा ग्रंथ.

गीतेवर वामनांनी समश्लोकी टीकाही लिहिली आहे. ती अतिशय सुबोध असून यथार्थदीपिकेशी संपूर्ण मिळतीजुळती आहे.

'सुश्लोक वामनाचा' ही कीर्ती वामनांना त्यांच्या आख्यानकवितेमुळे मिळाली आहे. अध्यात्माचा धागा या सर्व आख्यानांतही आहेच. वनसुधा, वेणुसुधा, मृत्तिकाभक्षण आदी भागवती आख्याने त्यांच्या कीर्तीस शोभावित अशी आहेत. रासक्रीडा, राधाविलास, राधाभुजंग अशा काही आख्यानांत उत्तान शृंगारवर्णने आहेत.

वामन प्रसंगवर्णन सुरेख करतात; शब्दचित्रे रेखीव व मोहक काढतात; यमकांचा सोस व अलंकारांचा हव्यास जेथे नसतो.

### १. भरतभाव

भरत जवळिं नाहीं मातुल-ग्राम-वासी ।
भरत-जननि धाडी कानना राघवासी ॥
दशरथ मृत झाला राम जातां वियोगें ।
तृण बहुत दिसांचें अग्निच्या जेविं योगें ॥१॥
मग भरत वसिष्ठें आणिला जों अयोध्ये ।
नगरि गत-धवा तों आणि निर्वीर्य योद्धे ॥
जन मृत-सम देखे हेतु कांहीं कळेना ।
जननिकृत कु-चेष्टा बुद्धितें आकळेना ॥२॥

अवो कैकयी हें काय । केलें तुवां हाय हाय ॥
न म्हणावे तुज माय । जन्मोजन्मीं वैरिणी ॥१॥
सर्व-जगदभिराम । वना धाडिला तो राम ॥
केलें विख्यात कुनाम । कीं हे पति-मारिणी ॥२॥
तुझ्या वधें न अ-धर्म । तूज मारावें हा धर्म ॥
परि निंदील हें कर्म । राम पाप-कारिणी ॥३॥
नाहींतरी प्राण आज्य । तुझे घालूनियां प्राज्य ॥
जाळूनियां राम-राज्य । दाखवितों करणी ॥४॥ ॥१०॥

देखोनियां गमन-निग्रह राघवाचा ।
बोले उभा भरत निश्चय-रूप वाचा ।
वर्षें चतुर्दशवरीच धरीन देहा ।
त्यानंतरें त्यजिन यास निरोप दे हा ॥५९॥

वर्षें द्वि-सप्तभरि काल समाप्त झाला ।
त्यानंतरें अजि तुझ्या चरणांबुजाला ॥
स्पर्शे शिरें न जरि देह, तयाच वारीं ।
यातें त्यजीनचि विरिंचि जरी निवारी ॥६०॥

वर्षें चतुर्दशहि रक्षिन शासनातें ।
अंगीकरीन न बसेन नृपासनातें ॥
सिंहासनावरि तुझ्या पद-पादुका मी ।
पूजीन तों तव पदांबुज-लाभ-कामीं ॥६१॥

पादुका जडित आणुनि हातें । रामचंद्र–चरणांबु–रुहांतें ।
लावुनी निज-शिरीं भरतानें । वंदिल्या रघुवरांघ्रि–रतानें ॥६२॥

(वृत्त : शिखरिणी)

प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलहि गळे,
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे, ||
सशाचेही लाधे विपिन फिरता शृंगहि जरी;
परंतू मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी ||

कालासी त्या वंदिजे -

गेला तो नृप, ते प्रधान अवघे, ते पंडितांची सभा
गेली ते नगरी, तशा शशिमुखी, ज्या तप्तहेमप्रभा
गेला तो नृपपुत्र, त्या शुभकथा, ऱ्या देखिले सर्व जे
ते जेणे स्मरणास योग्य रचिले, कालासि त्या वंदिजे.

## २३) शेख महंमद - (संत तुकारामांचे समकालीन)

श्री संत शेख महंमद महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत होते त्यांचे मूळ गाव श्रीगोंदा, जि अहमदनगर. शेख महंमदाला महाराष्ट्रात कबीराचा अवतार म्हणून ओळखले जाते. योगसंग्राम पवनविजय व निष्कलंकप्रबोध या त्यांच्या प्रमुख रचना आहेत.

साधारण मार्च महिन्याच्या सुरुवातीला दरवर्षी शेख महंमद यांच्या समाधी परिसरात सात दिवसांचा 'अखंड हरिनाम सप्ताह' ग्रामस्थांतर्फे आयोजित केला जातो. ज्यामध्ये सर्व जाती-धर्म आणि पंथाचे लोक सामील होतात.

असे कैसे या गोपाळे | नाही सोवळे ओवळे ||
कांटे केतकीच्या झाडा | आंत जन्माला केवडा ||
फणसा अंगी काटे | आत अमृताचे साठे ||
नारळ वरुता कठिण | परि अंतरी जीवाण ||
शेख महंमद अविंध | त्याचे हृदयी गोविंद ||१||
ऐसे केले या गोपाळे | नाही सोवळे ओवळे ||
काटे केतकीच्या झाडा | आंत जन्मला केवडा ||
फणसाअंगी काटे | आंत अमृताचे साठे ||
नारळ वरूता कठिण | परी अंतरी जीवन ||
शेख मंहमंद अविंध | त्याचे हृदय गोविंद ||

## २४) संत बहिणाबाई –(१६२८-१७००)



(यांची कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्याशी नाम साधर्म्यामुळे गल्लत होण्याची शक्यता आहे)

वारकरी विचाराचा झेंडा खांद्यावर घेऊन या परंपरेचा इतिहास आपल्या काव्यातून मांडला. तुकाराम महाराजांच्या विचारांचा आणि शब्दकळेचा प्रभाव बहिणाबाईंच्याही अभंगांत दिसून येतो.

अभंग :

“ज्ञानदेवे रचिला पाया | तुका झालासे कळस”
संत कृपा झाली | इमारत फळा आली ||
ज्ञानदेवे रचिला पाया | रचियले देवालय ||
नामा त्याचा किंकर | तेणे केला हा विस्तार ||
जनार्दन एकनाथ | ध्वज उभारिला भागवत ||
भजन करा सावकाश | तुका झालासे कळस ||
बहिणि म्हणे फडकती ध्वजा | निरुपणा केले बोजा ||

## २५) श्रीधर पंडित - (१६५८-१७२९)

श्रीधरांच्या कवितेने गेली अडीचशे वर्षे मराठी मनावर सदाचाराचे संस्कार केले आहेत. वेदान्तसूर्य हा एकच तत्वज्ञानपर ग्रंथ त्यांनी लिहिला. ईश्वरावतारांच्या कथा सांगणे हा त्यांच्या ग्रंथांचा प्रमुख विषय. हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप आणि शिवलीलामृत हे श्रीधरांचे चार ग्रंथ फार लोकप्रिय ठरले आहेत. जैमिनी अश्वमेघ ही त्यांची आणखी एक प्रदीर्घ रचना असून इतर स्फूट प्रकरणेही त्यांनी लिहिली आहेत. त्यांची भाषा अतिशय साधी, सोपी व सुबोध आहे. त्यांच्या काव्यात कोठेही थोडीशीदेखील रुक्षता नाही.

द्रौपदीवस्त्रहरण :

श्रीगणेशाय नम: | अजातशत्रु धर्मराज | धर्मपरायण धर्मात्मज |
स्वधर्माचरण देवद्विज- | भजन न सोडी सर्वथा ||१||
कौरव जे परम दुर्जन | कपटद्यूत त्यांशी खेळोन |
राज्य सेना देश धन | द्रौपदीसहित हारविले ||२||
पांच पांडव पंचांनन | कपटकूपी पडिले येऊन |
की पंच मराळ नेऊन | पंकगर्तेत रोविले ||३||
विदुरासी म्हणे दुर्योधन | पांडव जिंकोनि केले दीन |
जैसे दग्धवनी हरिण | तेजहीन क्षुधित पै ||४||
द्रौपदी जाहली अमुची दासी | ऊठ बोलावूनि आणी सभेसी |
तिचे पतिव्रतापण जनांसी | दाखवू आजी तत्वता ||५||
विदुर म्हणे पापखाणी | तुज निकट आली प्राणहानी |
काय अपवित्र बोलसी वाणी | महादुर्जना कपटिया ||६||
दुर्योधन म्हणे देखा | हा पांडवांचा पाठिराखा |
कृत्रिम संगत विवेका | हितशत्रु घातक पै ||७||
प्रातिकामी सूतपुत्र जाण | त्यासी सांगे दुर्योधन |
आणी पांचाळीस बोलावून | भीड सोडून सभेसी ||८||
हेर प्रवेशला मंदिरी | म्हणे अहो दुर्पदराजकुमारी |
दुर्योधने तेथवरी | बोलविले जाण पां ||९||
धर्मे हारविले समस्त | कोणाचा शब्द न चाले तेथ |
द्रौपदी म्हणे मनात | मांडला अनर्थ निर्धारे ||१०||

## २६) देवीदास - (१६८६)

व्यंकटेश स्त्रोत्र :

माझिया अपराधांच्या राशी | भेदोनि गेल्या गगनासी |
दयावंत हृषीकेशी | अपुल्या ब्रीदासी सत्य करी ||६||
पुत्राचे सहस्र अपराध | माता काय मानी तयांचा खेद |
तेवी तू कृपाळू गोविंद | माय-बाप मजलागी ||७||
उडदामाजी काळेगोरे | काय निवडावे निवडणारे |
कुचलिया वृक्षाची फळे | मधुर कोठोनि असतील ||८||
समर्थाचिये घरीचे श्वान | त्यासी सर्वहि देती मान |
तैसा तुझा म्हणवितो दीन | हा अपमान कवणाचा ||११||
लक्ष्मी तुझे पायातळी | आम्ही भिक्षेसी घालोनि झोळी |
येणे तुझी ब्रीदावळी | कैशी राहील गोविंदा ||१२||
कुबेर तुझा भांडारी | आम्हा फिरविसी दारोदारी |
यात पुरुषार्थ मुरारी | काय तुजला पै आला ||१३||
द्रौपदीसी वस्त्रे अनंता | देत होतासी भाग्यवंता |
आम्हालागी कृपणता | कोठोनि आणिली गोविंदा ||१४||

१) अन्नासाठी दाही दिशा, आम्हा फिरविसी जगदीशा
२) कन्या देऊनिया कुळ, मग काय विचारावे ?

## २७) अमृतराय - (१६९८-१७५३)

अमृतराय हे मध्वमुनीं यांचे शिष्य होते. औरंगाबादस विसामोरी म्हणून कोणी मुत्सद्दी होते. त्याच्या पदरी रायजी नौकरीला होते. धन्याची विलासी वृती व कर्कशा अशा पत्नीची कटकट यामुळे वैतागलेल्या रायजींनी नौकरी व संसार दोघांनाही सोडून दिले आणि भिक्षावृत्ती स्वीकारली. थट्टेखोर अशा अमृतरायांना मध्वमुनींनी ईश्वरभजनाकडे वळविले. तेव्हा त्यांनी आपल्या अमृत वाणीचा उपयोग करून सुरस आख्याने व सुंदर पदे रचण्यासाठी केला.

सुदामचरित्र :

श्रीकृष्णे सुदामजीला सोन्याची नगरी दिधली | स्वानुभूतिहृदया मधिली ||धृवपद||

ब्राह्मण ब्रह्मनिष्ठ बहु मोठा, त्याचा प्रपंच हीन करंटा, मुले भुकेने करिती तंटा,

घरात वाजे नकारघंटा, स्त्री वरवंटा, धैर्याचा वरवंटा, मनात परवंटाने, पोट बळे वेटाळूनि,

कधी कंटाळेना, पुरुषवाचन ते टाळुन चित्त विटाळू नेणे; नसतां मूठपसाभर दाणे,

पतिव्रता तीव्रता न जाणे, कांता ते एकांती नेउनि, म्लान वदन मउ बोल बोलली केविलवाणे,

'जी जी स्वामी!' द्वारकेत श्रीकृष्ण विष्णु गोपाळ तुमचा बाळमित्र चिरकाळ नांदतो,

ऐसे ऐकियले हो ! काने, त्याचे तुमचे दर्शन होतां, अपार धन देइल सन्माने,

समर्थ श्रीहरि सखा सुखाने, तुम्हासि अर्पिल सोने नाणे, प्रेमे आलिंगिल जीवाने,

तुम्ही कुटुंबी सदा हिनवाणे, कांपतसा दारिद्र्यहिवाने, हरि भेटतो आर्जवाने,

उचित दिसे जी तेथे जाणे.' यापरि ब्राह्मण दुबळा, त्याची अबळा,

ते बुबुळाते फिरवुनि बळानुजप्रभु यदुपती भेटीसाठी मधुर मृदुल बहु प्रकार वाक्ये वादळी ||श्रीकृष्णे||१||

## २८) श्रीसोहिरोबानाथ आंबिये - (१७१४-१७९९)

काय म्यां सांगों गे माये ! नवल जाहलें ॥ ध्रु० ॥
चैतन्य-सिंधुमाजीं, सैंधवकाया ही डोले ॥१॥
निर्वात कर्पुरदीपीं, प्रणवपतंग बोले ॥२॥
आकाशावरि जळ त्यावरि कमळिणी खोले ॥३॥

हात नाहीं पाय ऐसे भ्रमर गुंतले ॥४॥
नामचि नुरतें केलें, लया आमोदें नेलें ॥५॥
सोहिरा म्हणे हें आंगाथिलें, तें रूपाविण देखिलें ॥६॥

२

हंसाचा चारा । न इच्छिती वायस ।
आणि मेल्या मांस । भक्षितील त्यांचें ॥१॥
नागसरीचें सूख । दिवडा केविं कळावें ।
उंदीरचि गिळावे । त्याणें पैं गा ॥२॥
अग्निमाजी सती । एकलीच जळे ।
आणि पाहावया मिळे । सकळ जन ॥३॥
तैसा कोणी न झोंबे । साधूच्या आनंदा ।
आणिक करावया निंदा । कित्येक मिळती ॥४॥
सोहिरा म्हणे यांत । आमुचें काय गेलें ।
तुमचेचि केलें । पावाल तुम्हीं ॥५॥

## २९) महिपती - (१७१५-१७९०)

संत महिपती हे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याच्या राहुरी तालुक्यातील ताहराबाद येथे होऊन गेलेले संतकवी होते.

महिपती यांनी महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील अनेक संतांचा काव्यमय परिचय 'भक्त विजय' व `संतलीलामृत' या ग्रंथांत शब्दबद्ध केला आहे. संत साहित्यातील अभ्यासकांच्या लेखी संत महिपती महाराजांच्या रचनेला विशेष स्थान आहे. महिपती महाराजांच्या चरित्राचा परिचय ह.भ.प. विनायक महाराज शाळिग्राम समशेरपूरकर (संगमनेर) यांनी त्यांच्या 'नूतन संत चरित्र' या ग्रंथात नऊ ते पंधरा अध्यायांत दिलेला आहे.

एकनाथ चरित्र -

एकदा पितृतिथी येता जाण | ब्राह्मणासी दिले आमंत्रण ||
म्हणे उदयिक तुम्हा पितृक्षण || भोजनासी येणे निश्चित ||४५||
प्रत:काळी उठोनि सत्वरगती || गृहात करविली पाकनिष्पत्ती ||
दीड प्रहर येताचि निश्चिती || स्नाने सांगितली विप्रासी ||४६||
जेथे श्रीकृष्ण ब्राह्मणजन | तेथे साहित्यासी काय उणे ||
धोतरजोडे दक्षिणा सुवर्ण || द्विजाकारणे सिद्ध केली ||४७||
मग स्नान करूनि सत्वरगती || एकनाथ आले मंदिराप्रती ||
उपरीवारी जाउनि निश्चित्ती || धोत्रे वाळविता तेधवा ||४८||
तो अनामिक आणि त्याची कांता || विदीस झाडिती उभयता ||
पक्वान्नांचा सुवास तत्वता || आला अनुचिता तयांसी ||४९||
मग अंत्यजासी कांता बोले उत्तर || अन्नाचा सुवास येतसे सुंदर ||
हे आपुल्यासी प्राप्त नव्हे साचार || खातील द्विजवर भाग्याचे ||५०||
तेव्हा अनामिक म्हणे स्त्रियेसी || तू व्यर्थचि कासया लाळ घोटिसी ||
हे उष्ण उष्ण पक्वान्न आपणासी | आपल्या जन्मासी लाधेना ||५१||
आजि याचे घरी श्राद्ध जाण || उच्छिष्टही टाकिती पुरोन ||
तुवा नेणोनिया मूर्खपणे || वासना मनी धरियेली ||५२||

## ३०) पंडित मोरोपंत - (१७२९-१७९४) महाभारताचे भाषांतर

मोरोपंत हे स्वराज्याच्या कालातील शेवटचे आणि पंडित कवींच्या परंपरेतील सर्वश्रेष्ठ कवी होत. त्यांची एकूण रचना जवळजवळ साठ हजार आर्‍या भरते. त्यांचे आर्‍याभारत ही सर्वांत सरस व प्रदीर्घ अशी रचना होय.

आर्‍याभारता खालोखाल त्यांची रामायणावर रचना आहे. रामकथा त्यांनी एकशेआठ वेळा गायिली आहे. हा एक अदभुत चमत्कारच म्हणावयास हवा. रचनेचे नाना प्रकार त्यांत त्यांनी केले आहेत. त्यानंतर कृष्णविजय ऊर्फ बृहद्दशम, मंत्रभागवत आणि ब्रह्मोत्तरखंड ही प्रदीर्घ काव्ये येतात. भागवती प्रकरणे, संतचरित्रे, कुशलव्याख्यान,

संशयरत्नावली इ. अनेक छोटीमोठी प्रकरणे त्यांनी लिहिली आहेत. भगवद्गीतेचा समश्लोकी अनुवाद त्यांनी आर्‍याछंदात केला आहे. मोरोपंतानी केकावलीमध्ये ईश्वराची करुणा भाकली आहे. सीतागीत, रुक्मिणीगीत यांमधील भाषा, भावना व आविष्कार स्त्रीमनास शोभेल असा आहे. पंतांची ही रचना साधी, प्रसादपूर्ण व वैदर्भी रीतीची आहे. अन्यत्र त्यांची शैली गौडी आहे.

मोरोपंतांनी आर्‍याछंदास प्रतिष्ठा मिळवून दिली. ज्ञानेश्वरांची ओवी, तुकोबाचा अभंग आणि वामनांचा श्लोक यांबरोबरच मोरोपंतांच्या आर्येस जुन्या मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळाले आहे.

योग्य घटनांची निवड व संक्षेपातील विवेक. निवेदनातील ओघ व प्रवाहीपणा, व्यक्तिदर्शनातील चातुर्य व प्रसंगवर्णनातील कसब, त्याचबरोबर नाट्यपूर्ण संवाद व विविध उपमादृष्टांतांची पेरणी यांमुळे मोरोपंतांची कविता, ही एकदा त्यांच्या संस्कृतप्रचुर भाषेचा तट ओलांडला, की रसिकाला मोहविणारी ठरते. कीर्तनप्रसंगी तिचा सर्वत्र उपयोग केला गेला आणि अव्वल इंग्रजीच्या काळात त्यांची एक परंपराच निर्माण झाली.

मोरोपंतांच्या केकावल्या खूप गाजल्या.
त्यातली ही एक सुप्रसिद्ध केकावली -

सुसंगती सदा घडो, सुजन-वाक्य कानी पडो ||
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ||

सदन्घ्रि-कमळी दडो मुरडिता हटाने अडो ||
वियोग घडता रडो, मन भवच्चरित्री जडो ||३०||

रसने न राघवाच्या -

रसने न राघवाच्या थोडी यशात गोडी ||धृ.||
निंदास्तुती जनांच्या, वार्ता वधूजनांच्या,
खोट्या व्यथा मनाच्या, काही न यात जोडी ||
साधूंचिया सदाते, सुख देतसे सदा ते,
श्रवणी सुधा, मदाते सोडूनि हात जोडी ||
विनवी मयूर भावे, सुखि हेचि नित्य गावे |
मजला द्रवोनि पावे, दुसरे न बंध तोडी ||

चमत्कृतीजन्य रचना :

दाम रामायण -

श्रीपती झाला दशरथसुत राम दशाननासी माराया, |
मा राया जनकाची होय सुता त्रिजगदाधि साराया ||१||
सारा या प्रभुची हे लीला गाती सदैवही सुकवी |
सुकवी भवजलनिधिते निरुपम सुख रसिकजनमनी ||२||

निरोष्ठ रामायण : (ओष्ठ्यवर्ण विरहित : प.फ.ब.भ.म. ही अक्षरे नसलेले)

श्रीहरि दशरथनंदन झाला दशकंठक्षय कराया, |
दर शेष चक्र ही जनि घेती जगदखिल संकट हराया ||१||
अंगाज चार निधीचे संस्कृत साक्षर नरेंद्र कीर्तिकर |
निरखी, नितांत हर्षे हा चि न तैसा चि नागरिकनिकर ||२||

तेव्हा गेला होता कोठे, राधासुता तुझा धर्म ?

जेव्हा सभेसी नेली पांचाळी, मानिले मनी शर्म !
तेव्हा गेला होता कोठे, राधासुता तुझा धर्म ? ||
फेडी वस्त्र सतीचे जेव्हा उघडे करावया आंग,
गेला होता कोठे धर्म तुझा तेधवा ? वृषा, सांग ||
चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले, असे नृपे खोटे
कर्म करविता, कर्णा, होता तव धर्म तेधवा कोठे ? ||
केले दग्ध जतु-गृही त्वा पांडव वारणावती जेव्हा,
गेला होता कोठे धर्म तुझा, सूत-नंदना, तेव्हा ? ||
अभिमन्यु बाळ बहुती वधिता, त्वा वारिले न ते कर्म;
तेव्हा गेला होता कोठे, राधासुता तुझा धर्म ? ||

मोरोपंतांच्या इतर रचना : सीतागीत, हंसकाकीय आख्यान,

## ३१) मध्वमुनीश्वर - (१७३१ मृत्यू)

माझं अचडं बचडं छकडं ग |
विकसित पंकजलोचन ज्याचे |
जननि म्हणे हे चिपडं ग ||माझं||१||
त्रिभुवनपालक बालक त्याला |
पांघरविते घोंगडं ग ||माझं||२||
अंगणि रांगत मंजुळ बोलत |
माझं सोन्याचं ठिगडं ग ||माझं.||३||
मध्वमुनीश्वर खेळवि अंकी |
ब्रह्मसनातन उघडं ग ||माझं.||४||

२) उद्धवा शांतवन कर जा
उद्धवा शांतवन कर जा - त्या गोकुळवासि जनांचे ||धृ.||
बा नंद यशोदामाता - मजसाठी त्यजितिल प्राण |
त्यागुनी प्रपंच फिरती, - मनि उदास रानोरान |
अन्नपाणी त्याजिले रडती, -अति दु"खित झाले दीन |
जन्मलो तैहुनी झटले |
काटिखांदे वाहता घातले |
आतले रक्त देहाचे ||१||
मजलागी तिळतिळ तुटले |

तंतकवी - (तंतू वाद्यांच्या सहाय्याने गायिलेली पदये - पोवाडे, लावण्या, फटका इत्यादी

लावणी आणि पोवाडा या दोन जोडप्याचा संसार म्हणजे शाहिरी वाङ्मय असे म्हणत असताना शाहिरी वाङ्मयात मुख्यत: हे दोन घटक महत्त्वाचे आहेत.

'लावणी' ही सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनाकरिता त्यांना रुचतील, पचतील अशा शब्दांमध्ये, त्याचप्रमाणे पौराणिक व लौकिक विषयावर वा आध्यात्मिक विषयावर कडे, ढोलक यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज रचना आहे. त्यामुळे ती सर्वसामान्य जनांच्या मनाला भावते. लावणीमध्ये शृंगारिक लावण्यांची संख्या भरपूर असून, आध्यात्मिक व भेदिक लावण्या व इतर विविध विषयांवरील लावण्याही सापडतात. लावणीमध्ये शृंगारिक लावण्या मोठ्या प्रमाणात असून, त्यात शृंगाररस ओतप्रोत भरलेला आहे.

'पोवाडा' म्हणजे 'कीर्तिकाव्य' असून, मराठीतील लोकप्रिय काव्यप्रकार आहे. शाहीर डफ, झांज, साथीला ढोलकी–टाळ, तुणतुणे आणि मागे कोरस म्हणणारे गायक अशा संचासह जेव्हा पोवाडा म्हणत असतो तेव्हा श्रोत्यांच्या अंतरंगात वीरवृत्ती जागी होत असते. त्यामुळे पोवाडा हा दृक्–श्राव्य काव्यप्रकार आहे.

पोवाड्यात वीर पुरुष, पराक्रमी आणि गुणसंपन्न व्यक्तिंचे, त्यांच्या जीवनातील घटना–प्रसंगांचे प्रशंसात्मक वर्णन केलेले असते. पोवाड्याचा विषय ऐतिहासिक आणि राजकीय जीवन चित्रण करणारे आसल्याने त्यामध्ये तोच तोपणा आलेला दिसतो. विषयाच्या वर्णनामध्ये सांकेतिकता निर्माण झालेली असली, तरी त्यातून आविष्कृत होणाऱ्या वीररस, करूणरस आणि उद्‌भुत रसांमुळे पोवाडे वैशिष्ट्यपूर्ण ठरलेले दिसतात.

याप्रमाणे मराठमोळे रूप घेऊन जनसामान्यांची करमणूक करणारी लावणी व पोवाडे हे दोन्ही रचना प्रकार वैशिष्ट्यपूर्ण असून, त्यांना बऱ्याच वर्षांची परंपरा आहे. हे काव्यप्रकार रंजन व स्तुतिगान किंवा कीर्तिगानाच्या प्रेरणेने निर्माण झालेले असले, तरी इतर अनेक गुण त्यांत समाविष्ट असलेले दिसतात.

## ३२) अनंत फंदी -

अनंत फंदी हे संगमनेर येथे राहत होते. त्यांचे आडनाव घोलप असे होते. हे दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या काळात होऊन गेले.
ते तमाशा करत असत, पण नंतर त्यांनी तमाशा सोडला. त्यांनी आठ लावण्या व काही पोवाडे रचले. 'रावबाजीवरील लावणी, नाना फडणवीसाचा पोवाडा व फटका हे विशेष नावाजले. त्यांना ‘फटका‘ या काव्यप्रकाराचे जनक म्हटले जाते.
शार्दूलविक्रीडित, शिखरिणी या वृत्तांत त्यांनी रचना केल्या आहेत.

### फटका -

बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडु नको
संसारामधी ऐस आपला, उगाच भटकत फिरू नको

चल सालसपण, धरुनी निखालस, खोटा बोला बोलुं नको
अंगी नम्रता सदा असावी, राग कुणावर धरु नको

नास्तीतकपणी तूं शिरुनि जनाचा बोल आपणा घेउं नको
आल्या अतिथा मुठभर दाया मागेपुढती पाहू नको

मायबापावर रुसू नको
दुर्मुखलेला असूं नको
व्यवाहारामधी फसूं नको
परी उलाढाली भलभलत्या पोटासाठी करु नको॥१॥

वर्म काढुनी शरमायाला उणे कुणाला बोलुं नको
बुडवाया दुसरयाचा ठेवा, करनी हेवा, झटू नको

मी मोठा शाहणा धनाढ्याही, गर्वभार हा वाहू नको

एकाहन चढ एक जगामधी, थोरपणाला मिरवु नको

हिमायतीच्या बळे गरिब गुरिबांला तूं गुरकावुं नको
दो दिवसाची जाइल सत्ता, अपेश माथां घेउं नको

विडा पैजेचा उचलुं नको
उणी तराजू तोलुं नको
गहाण कुणाचे डुलवु नको
उगिच भीक तूं मागुं नको
स्नेहयासाठी पदरमोड कर, परंतु जामिन राहू नको॥२॥

उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठी करु नको
बरी खुशामत शाहणयाचि परी मुर्खाची ती मैत्री नको

कष्टाची बरी भाजीभाकरी, तूपसाखरेची चोरू नको
दिली स्थिती देवाने तीतच मानी सुख, कधी विटू नको

असल्या गांठी धनसंचय, कर सत्कार्यी व्यय, हटू नको
आतां तुज गुजगोष्ट सांगतो. सत्कर्मा तूं टाकुं नको

सुविचारा कातरु नको
सत्संगत अंतरु नको
दैत्याला अनुसरु नको
हरिभजना विस्मरू नको
सत्कीर्ती - नौबतिचा डंका गाजे मग शंकाच नको॥३॥

## ३३) परशराम - (१७५४-१८४४)

सोनार शिक्का नवा निघाला पंधरा आणे जरी बट्टा ||धृ.||
वडाची साल पिंपळाला लाविता कशी लागेल पहा शोधून |
हेल्यावर जरी दिली अंबारी मट्कन बसेल भारानं |
पखाल आपण वाहू विसरला घरोघरच असेल गाणं |
हिजडे जर तरवार मारते शिपायाशी पुसते कोण |
उदंड झाला ताजा गधडा याला शोभल काय वर जीण |
कोल्हे कुत्रे भुंकू लागले हत्ती पळेल काय भिऊन |
भीक मागून पित्र घालशी तर स्वर्गी कैसा वाजेल घंटा |
सोनार शिक्का नवा निघाला ||१||

## ३४) रामजोशी - (१७६२-१८१२)

लोकशाहीर रामजोशी - राम जगन्नाथ जोशी. गाव: सोलापूर (महाराष्ट्र).

'सुंदरा मनामधी भरली' ही व अशाच प्रसिद्ध तमाशाप्रधान लावण्यांचा रचयिता व गायक. रामजोशींच्या फडात बया आणि चिमा अशा दोन नाचणाऱ्या तमासगिरिणी असत.

रामजोशींना लहानपणापासूनच तमाशाचा छंद होता. त्यामुळे त्यांना शिक्षणात रस नव्हता. घरासमोरच धोंडिबा शाहिराचा फड होता. रामजोशी नेहमी तिकडे जाऊन बसत. त्यामुळे त्यांना लावण्या रचण्याचा व डफावर गाणी म्हणण्याचा षोक लागला.

रामजोशी उत्तम कीर्तनकार म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध पावले.

रामजोश्यांना मराठीखेरीज कानडी, हिंदी आणि संस्कृत या तीन भाषा उत्तमरीत्या येत होत्या.

संस्कृताध्ययन, यमक-अनुप्रासांची लयलूट, संस्कृत-प्राकृत शब्दांच्या मिश्रणाने घडून आलेली भाषेची सजावट, शीघ्रकवित्व, समयसूचकता आणि प्रभावी वक्तृत्व आदी गुणांमुळे रामजोशी यांची कीर्तने अतिशय लोकप्रिय झाली.

लावणी :

सुंदर मनामधे भरली जरा नाही ठरली हवेलित शिरली मोत्याचा भांग |
अरे गड्या हौस नाही पुरली म्हणोनि विरली पुन्हा नाही फिरली कुणाची सांग ||धृ.||
जशी कळी सोनचाफ्याची न पडू पाप्याची दृष्टी सोण्याची ती नार |
अति नाजुक तनु देखणी गुणाची खणी उभी नवखणी चढुन सुकुमार |
जशि मन्मथरति धाकटी सिंहसम कटी उभी एकटी गळ्यामध्ये हार |
अंगी तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर मारिते लहर मदनतलवार |

कोण्या ग सुभागाची -

कोण्या ग सुभगाची मदन मंजरी | सांग सखे सुंदरी ||धृ.||
इच्या सौंदर्याची सीमा | झाली गडे रतिहुनी अति उत्तम |
पाहुनिया मुखचंद्रमा | सखे गडे अमा गमति पौर्णिमा |
काय अधरांची रक्तिमा | लाजवी नवकुंकुम विद्रुमा |
अंगि वसन जिच्या भर्जरी | कोण्या ग सुभगाची ||१||

फटका -

भला जन्म हा तुला लाभला :
भला जन्म हा तुला लाभला खुलास हृदयी बुधा |
धरिशि तरि हरिचा सेवक सुधा ||धृ.||
चराचरी गुरु तरावयाला नरा शिरावरि हरी |
जरा तरि समज धरी अंतरी |
हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरी |
मठाची उठाठेव का तरी |
वनात अथवा जनात हो का मनात व्हावे परी |
हरीचे नाव भावन्बुधितरी ||चाल||
काय गळ्यात घालुनि तुळशीची लाकडे |
ही काय भवाला दूर करितील माकडे |
बाहेर मिरविशी आत हरिशि वाकडे |
अशा भक्तिच्या रासारहित तू कसा म्हणविशी बुधा
हरिस सांडूनि घेसी दुधा ||१||

## ३५) रामानंद -

भूपाळी गणपतीची

उठा उठा सकळिक | वाचे स्मरावा गजमुख
ऋद्धि-सिद्धीचा नायक | सुखदायक भक्तासी ||धृ.||
अंगी शेंदुराची वटी | माया शोभतसे कीरिटी |
केशवकस्तुरी लल्लाटी | हार कंठी साजिरा ||१||
कानी कुंडलीची प्रभा | चंद्र-सूर्य जैसे नभा |
माजि नागबंदी शोभा | स्मरता उभा जवळी तो ||२||
कांसे पितांबराची धटी |हाती मोदकांची वाटी |
रामानंद स्मरता कंठी | तो संकटी पावतो ||३||

## ३६) श्रीरंगात्मज -

धन्य धन्य हे प्रदक्षिणा गुरुरायाची |
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची |धृ.||

## ३७) प्रभाकर - (१७६९-१८४३)

प्रभाकर जनार्दन दातार. प्रभाकर नावाचा हा लावणीकार रत्नागिरीमधील मुरुड या गावचा राहणारा. त्याने पेशवाईचा उत्कर्ष आणि अपकर्ष दोन्हीही पाहिले. प्रभाकरचा जन्म मात्र गंगापूर जि. नाशिक येथे झाला. प्रभाकरच्या कवनाने तो काळ गाजविला त्याच्या कवनात उत्तान श्रृंगार आढळतो. त्याचा संग्रह १९२० मधे प्रसिद्ध झाला. १३ पोवाडे ११९ लावण्या त्याने लिहिल्या. माधवराव पेशवे यांचा 'रंग' आणि त्यांचा 'मृत्यू' यासंबधीचे पोवाडे प्रसिद्ध आहेत. सवाई माधवरावांचा पोवाडा करुणरसाचा उत्कट अविष्कार करतो.

### २३. प्रभाकर

*लक्ष्मी–पार्वती संवाद*

लक्ष्मी गर्वे निंदा बोलुन झिडकारिती पार्वती ।
आहे ठाऊक पुरुषार्थ तुझा तुज प्रिय असो पशुपती ।।ध्रु०।।

स्मशानवासी भूषण भयंकर पिंगट मुकुटीं जटा ।
भाळी चंद्र ज्या तीन नेत्र भस्माचा कपाळीं पटा ।
व्याघ्रांबर गजचर्मांबर परिधान शुद्ध कानफटा ।
रुंडमाळ ती कंठीं कुंडलें भुजंग रुळती कटा ।
त्रिशुळ पाणी त्रिपुंड भाळीं लोहोकंकण मनगटा
नंदी वहन सर्पाचा सदोदित करिं कमरे लंगुटा ।
कसा आवडतो शंकर गिरिजे सांग तुला मजप्रती ।
लक्ष जन्मिचें पातक म्हणउन पडलिस ऐशा हातीं ।।१।।

भोळा माझा सांब लक्षुमी उगाच निंदूं नका ।
आदी अंत नसे अगम्य सुख तें अप्राप्त ब्रह्मादिकां ।
सोळा सहस्र शत एक मुख्य तुम्ही अष्टजणी नायिका
कार्यवादु तो कृष्ण कसा करी पूर्ण मनोरथ सखा ।
वक्रंदंतशिशुपालकीटकां कपटें मर्दुन बका ।
प्रताप मुखें वर्णितां कशा भाळल्यात गोरक्षका ।

जरासंध रिपु भयें वसविली जळांत द्वारावती ।
तस्करास कसा श्वशुर जडला पहा भीमक भूपती ।।
मच्छ कूर्म हा सूकर झाला सिंह वामन श्रीपती ।
जन्म गेला पहा अशा खालिं म्हणे लक्ष्मीस पार्वती ।।२।।

भूतें पिशाचें यक्ष ब्रह्मराक्षस हें ज्याचे दुत ।
श्वानें सभोंवतीं मिळवुन संगें फिरे भिक्षा मागत ।
भुंभुं वाजवि शंख मुखानें चिताभस्म लावी नित ।
शूर्पकर्ण षणमुख ज्याचें नवल परीचे सुत
मना गमे तिथें निद्रा करितो जिवंत पहाता भुत
हिमालयाचे थोर असें प्रारब्ध पाहुन विस्मित ।
धन्य तुझी पार्वती अशाची राखितेस चितवृती ।
दैवदशा भ्रतार तामसी कठीण होतां गती ।।३।।

## ३८) होनाजी आणि बाळा कारंजकर -

घन:श्याम सुंदरा ही अमर भूपाळी लिहिणारा होनाजी आणि त्याचा साथीदार बाळा कारंजकर. या  जोडीने आपला तमाशा गाजवला आणि होनाजीबाळा हे जोडनाव रुढ केले.

अमर भूपाळी चित्रपटात आलेली सांगा मुकुंद कुणी हा पाहिला, लटपट लटपट तुझं चालणं इत्यादी अनेक गाणी मूळ होनाजीच्याच रचनेतून थोडय़ाफार फरकाने घेतलेली आहेत.

आयुष्याच्या सर्व वाटचालीत होनाजीने चांगले यश मिळविले. त्यामुळे स्वाभविकच विरोधकांची पोटदुखी वाढलेली होती. त्याच्या विरोधात असलेल्या कोण्या पाताळयंत्री माणसाने त्याच्यावर मारेकरी घातले आणि त्या असह्य माराने आसन्नमरण झालेला होनाजीचा छिन्नविच्छिन्न देह पुणे शहरात आणून टाकला. दारुण यातनांनी होनाजी गतप्राण झाला. (- ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर)

## शाहिरी कवने -

शाहिरी कवनाचे दोन भाग आहेत. कलगीवाले आणि तुरेवाले. कलगीतुरा हा दोन पक्षांतील झगडा असतो.

कलगी म्हणजे तुळशीच्या मंजरीसारखा किंवा मोराच्या तुऱ्यासारखा ताठ उभा राहणारा तुरा आणि
तुरा म्हणजे मक्याच्या कणसातील केसासारखा किंवा पगडीच्या झिरमिळ्यासारखा खाली लोंबणारा तुरा.
कलगीवाल्याचे निशाण भगवे वा जरीपटक्याचे असते आणि
तुरेवाल्याचे पांढरे वा हिरवे.
कलगीवाले हे प्रकृतिवादी वा शक्तिवादी आणि
तुरेवाले हे पुरुषवादी वा शिववादी.
रामजोशी, अनंत फंदी हे तुरेवाले आणि
प्रभाकर,  परशराम,  सगनभाऊ,  होनाजी,  पठ्ठे बापूराव हे कलगीवाले.

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला । उठीं लवकरि वनमाळी |
उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु ॥

सायंकाळी एके मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं ।
अरुणोदय होतांचि उडाले चरावया पक्षी ।
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणदक्षी ।
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ।
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं ।
यमुनाजळासी जाती मुकुंदा | दध्योदन भक्षीं ॥
मुक्तता होऊं पाहे । कमळिणीपासुनियां भ्रमरा ॥
पूर्वदिशे मुख धुतलें । होतसे नाश तिमिरा ॥
उठिं लवकरि गोविंदा । सांवळ्या नंदकुमारा ।
मुखप्रक्षालन करीं अंगिकारी भाकर-काला ॥ १ ॥
घरोघरी दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती ।
गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति जाती ॥
प्रवर्तोनि गृहकर्मी रंगावळि घालूं पाहती ।
आनंदकंदा ! प्रभात झाली उठ सरली राती ॥
काढीं धार क्षीरपात्र घेउनि धेनू हंबरती ।
द्वारी उभे गोपाळ तुजला हांक मारुनि बाहती ॥
हे सुमनहार कंठी । घालि या गुंजमाळा ।
हाती वेत्रकाष्ठ बरवें । कांबळा घेइं काळा ॥
ममात्मजा मधुसूदना । हृषीकेशी जगत्पाळा ।
हंबरताति वांसरे हरि धेनुस्तन-पानाला ॥ २ ॥

## ३९) रघुनाथ पंडित - (१८००)

मराठी काव्य परंपरेतील हे एक श्रेष्ठ पंडित व कवी होत. यांचे संस्कृत व फार्सी या भाषांवर प्रभुत्व होते. महाभारतातील कथा या विषयावरील मराठीतले महत्त्वाचे कवी.

दमयंती स्वयंवर

तेथील एक कलहंस तटीं निजेला|
जो भागला जलविहार विशेष केला||
पोटीच एक पद, लांबविला दुजा तो|
पक्षी तनु लपवि, भूप तया पाहतो||१||

नलराजा आणि हंस -

सवे सेना भूपाळ निघालाहे
शीव लंघी उद्यान एक पाहे
रिघे तेथे मित सेवकांसी बाहे
फौज सारी बाहेर उभी राहे ||
तया वनी एक तटाक तोये
तुडुंबले, तामरसानपाये
निरंतरामंद मरंद वाहे
तपातही यास्तव रिक्त नोहे ||
त्यातील एक कलहंस तटी निजेला
जो भागला जल-विहार विशेष केला
पोटीच एक पद, लांबविला दुजा तो
पक्षी तनू लपवि भूप तया पहातो ||
टाकी उपानह पदे अती-मंद ठेवी
केली विजार वरि डौरहि मौन सेवी
हस्ती करी वलय उंच अशा उपायी
भूपे हळूच धरिला कलहंस पायी ||
कलकल कलहंसे फार केला सुटाया
फडफड निजपक्षी दाविले की उडाया
नृपतीस मणि-बंधी टोचिता होय चंचू
धरि सुदृढ जया तो काय सोडील पंचू ||

तदितर खग भेणे वेगळाले पळाले
उपवन-जल-केली जे कराया मिळाले
स्वजन गवसला जो त्याजपाशी नसे तो
कठिण समय येता कोण कामास येतो ? ||

**४०) महात्मा जोतिबा फुले -** (१८२७-१८९०) हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली; शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेऊन पुरोगामी विचारांची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.

" विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली।
गतीविना वित्त गेले। वित्ताविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।"

अखंडादि काव्यरचना

सर्वांचा निर्मीक आहे एक धनी || त्याचे भय मनी || धरा सर्व ||१||
न्यायाने वस्तुंचा उपभोग घ्यावा || आनंद करावा || भांडू नये ||२||
धर्मराज्य भेद मानवा नसावें || सत्याने वर्तावे || ईशासाठी ||३||
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों || आर्यास सांगतो || जोती म्हणे ||४||

एक सुर्य सर्वा प्रकाशास देतो || उद्योगा लावितो || प्राणीमात्रा ||१||
मानवासहीत प्राण्यांचे जीवन || सर्वांचे पोषण तोच करी ||२||
सर्वा सूख देई जनकाच्या परी || नच धरी दूरी || कोणी एका ||३||
मानवांचा धर्म एकच असावा || सत्यांने वर्तावा || जोती म्हणे ||४||

एक चंद्र नित्य भ्रमण करितो || सर्वा सुख देतो || निशीदीनी ||१||
भरती ओहोटी समुद्रास देतो || जल हालवितो || क्षारांसह ||२||
पाणी तेच गोड मेघा योगे होते || संतोषी करीते || सर्व प्राण्या ||३||
मानवांचे साठी बहु धर्म कसे || झाला का हो पीसे || जोती म्हणे ||४||

जगामाजी सर्व मजला असावे || शेजाऱ्याव नसावे || हेवा मुळ ||१||
स्वतः हितासाठी तळमळ करी || झटे सर्वोपरी || किर्तीसाठी ||२||

खरा मतलबी सर्वात वर्ततो || निराशा करितो || बापड्यांनी ||३||
आत्मपरिक्षेला नाही जुमानात || झुरे विषादांत || जोती म्हणे ||४||

आपहितासाठी सत्याने वर्तावे || सुमार्गी लावावे || भावंडास ||१||
तुझी वर्तणूक आधी कर नीट || दुर्गुणांचा धीट || खरे सुख ||२||
मानवी सुखास वाटेकरी होती || फळास भोगीती || सर्वांसह ||३||
मानवाचा धर्म सत्य खरी नीती | जोती म्हणे ||४||

सत्याचा जिव्हाळा मनाची स्वच्छता || चित्तास स्वस्थता || जेथे आहे ||१||
जेथे जागा धीर सदा हृदयात || सत्यवर्तनात || खच्ची घाला ||२||
पिडा दुःखे सोशी संकटे निवारी || गांजल्यास तारी || जगामाजी ||३||
धीर धरूनीया सर्वा सुख देती || यशवंत होती || जोती म्हणे ||४||

आद्यापेक्षा जास्त खर्च जे करीती || ऋणकरी होती || जिवा कांच ||१||
सोयरेधायरे मागे पुढे येती || तुकडे मोडीती || दिमाखाने ||२||
मतलबी स्नेही रसाळ बोलती || भोंदुनीया खाती || संधी येता ||३||
गृहकार्यदक्ष होऊ विसरला || चोंबड्यांनी खाल्ला || जोती म्हणे ||४||

## ४१) पठ्ठे बापूराव - (१८६८-१९४१)

पठ्ठे बापूरावांचे नांव श्रीधर कृष्ण कुलकर्णी रेठरेकर. हरणाक्ष रेठरे (वाळवा तालुका, सांगली जिल्हा) या गावी झाला. लहानपणापासून श्रीधरला तमाशाचा नाद लागला. त्यांची घरची परिस्थिती जेमतेम होती. आई-वडिलांनी श्रीधरला शाळेत घातले.

गावी घरासमोर असलेल्या वाड्यातच तमाशाचा फड चालायचा. श्रीधरच्या कानावर त्या वाड्यातल्या तमाशाचे सूर येत. पण ब्राह्मण आणि कुलकर्णीपद, त्यामुळे रात्री पटकन उठून तमाशाला जाऊन बसायचे धाडस त्यांना होईना. मनातली तळमळही त्यांना गप्प बसू देईना. बापू चोरून तमाशाला जाऊ लागले. तमासगीरांना त्यांनी अनेक लावण्या लिहून दिल्या. तमाशात बापूरावाच्या लावण्या आणि कवने गायली जाऊ लागली. `श्रेष्ठवर्ण मी ब्राह्मण असूनी ! सोवळे ठेवले घालूनि घडी !! मशाल धरली हाती तमाशाची लाज लावली देशोधडी !!' ह्या जिद्दीने `कुबेराला लाजवील असे वैभव तमाशाच्या जोरावर पायाशी लोळवीन` हा संकल्प करूनच बापूराव घराबाहेर पडले. गावोगावी तमाशाचा फड उभे राहू लागले. बापूरावांचे स्वतःचे काव्य, योग्य साथ, पहाडी आवाज आणि लावणीतील शृंगाराने तमाशा बदलला. त्यातून श्रीधरची वाहवा होता होता `पठ्ठेबापूराव ` म्हणून ते प्रसिद्धीला आले. बहिष्कार

पण पुढे पठ्ठे बापूराव आणि पवळा या दोघांवर सर्वांनी बहिष्कार टाकला. तमाशाचा फड बंद पडला. आर्थिक कोंडी झाली. त्यामुळे बापूराव व पवळा या जोडीने ९०० रुपयांचा करार करून स्वतःचा लिलाव केला. मुंबईच्या अबू शेठनी लिलाव घेतला. मुंबईच्या एल्फिन्स्टन थिएटरवर पवळा पठ्ठे बापूराव यांना पाहण्यासाठी तिकीट लावले. दोन आण्याच्या तिकिटावर दररोज चारशे रुपयांचा गल्ला जमत असे. असे नामदेव व्हटकरांनी आपल्या पुस्तकात नमूद केले आहे.

मुंबई ग नगरी बडी बांका.. जशी रावणाची दुसरी लंका.. वाजतो ग डंका
डंका चहूं मुल्की राहण्याला गुलाबाची फुल्की पाहिली मुंबई
मुंबई ग नगरी सदा तरनी व्यापार चाले मनभरुनी दर्याच्या गो वरुनी
वरुनी जहाजे फिरती आगबोटीत निराळी धरती पाहिली मुंबई

बोरीबंदर कोटकिल्ला टाटाच्या ग मैदानातला कमिटीचा बंगला देतो भेटीसरशी
ताजमहाल पॅलेस हाटेल तिथे तुला भेटेल त्याची इच्छभोजन मेजवानी मजेदारशी
सेक्रेटरी हॉल तुला काळाघोडा बहाल कुलाब्याच्या दांडीबागची हवा थंडगारशी
ट्रामगाड्या मोटारगाड्या हजार देतो खटारगाड्या व्हिक्टोरिया नव्या गाड्या रंगदारशी
लगबग भारी चाले गोंधळ सारा रस्त्यात मधे मोटारीची शिंग वाजे हितं गर्दी
परळापासून सरळ रस्ता भायखळ्याच्या पुलावरचा
तिथून पुढे खालचा लागंल उभा पारशी
जमशेदजी बाटलीवाला याचा दवाखाना तुला इनाम दिला राहण्याला बिना वारशी
बटाट्याची चाळ तुला कायम सांभाळ तिथं बांधुनिया चाळ मग ताल धरशी
अगं हे दाजी हे.. अगं हे.. हो हो.. ईर.. जी जी जी जी जी
पवळे जपून चाल.. घाईघाईत होतिल हाल
धर हात सावरी तोल
हा पठ्ठे बापुचा बोल
अगं ही मुंबई.. पाहिली मुंबई..

## ४२) संत गाडगेबाबा - (१८७६-१९५६)



इतर संतांच्या तुलनेत त्यांचे कार्य अगदी वेगळे आहे. त्यांनी कीर्तने केली व त्याच्या माध्यमातून लोक जागृती केली. अंधश्रद्धेवर जोरदार हल्ले केले. स्वत: स्वच्छता करून स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. त्यांची कीर्तने लोक आवडीने ऐकत असत.

गाडगे महाराज हे ईश्वर कशात आहे याची नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी; अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी |" असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. "देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेऊ नका." अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत.

डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या

कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत.

'मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत.

एकदा गाडगेबाबा रस्त्याने जात असताना...समोर एक व्यक्ती दगडाची पूजा करत असताना त्यांना दिसली. त्याने दगडावर हार चढविला. दुधाने अंघोळ घातली. इतक्यात एक कुत्रा आला आणि मागील पाय वर करून त्या दगडावर मूत्र विसर्जन करू लागला. ती व्यक्ती चिडली. त्याला कुत्र्याचा फार राग आला. तो कुत्र्याला मारण्यासाठी हातात दगड घेऊन धावू लागला. तेव्हा गाडगेबाबा म्हणाले, " बिचाऱ्या गरीब मुक्या जनावरांना त्रास का देता ? त्याला हे कुठं माहीत आहे की, माणसांचा देव दगड असतो म्हणून ?"

गाडगेबाबांनी स्वत:च दहा कलमी एक कार्यक्रम आपल्या कीर्तनातून जनतेपर्यंत पोचवला होता आणि जनता-जनार्दनाच्या मदतीने खूप चांगल्या प्रकारे राबवला होता. त्यांचा दहा कलमी कार्यक्रमसुद्धा त्यांच्या कीर्तनाचा प्राणभूत घटक होता. सामान्य जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळालेली ती दहा कलमे अशी होती-

१. भुकेलेल्यांना.... अन्न द्या.
२. तहानलेल्यांना.... पाणी द्या.
३. उघड्या-नागड्यांना.... वस्त्र द्या.
४. अनाथ आणि बेघरांना.... आसरा द्या.
५. बेकारांना.... काम द्या.
६. दु:खी आणि निराश उपेक्षितांना.... प्रेम आणि हिंमत द्या.
७. गरीब मुला-मुलींना.... शिक्षण द्या.
८. अंध-पंगू रोग्यांना.... औषधपाणी द्या.
९. पशु-पक्षी मुक्या प्राण्यांना.... अभय द्या.
१०. गरीब तरुण-तरुणींना.... संसार थाटून द्या.

हाच खरा रोकडा धर्म आहे!
ही खरी देवपूजा आहे!

## ४३) संत (राष्ट्रसंत) तुकडोजी महाराज -



अमरावतीजवळ मोझरीच्या गुरुकुंज आश्रमाची स्थापना, त्याचप्रमाणे ग्रामगीतेचे लेखन हाही त्यांच्या जीवनकार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. स्वत:ला ते तुकड्यादास म्हणत कारण भजन म्हणताना ते जी भिक्षा घेत, त्यावरच आपण बालपणी जीवन कंठिले, ह्याची त्यांना जाणीव होती. त्यांचे मूळचे माणिक हे नाव त्यांचे गुरू आडकोजी महाराज यांनी बदलून तुकडोजी असे केले.
खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल, देवभोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले.
सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंताच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते.

महिलोन्नती, कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते, हे त्यांनी आपल्या कीर्तनांद्वारे समाजाला पटवून दिले. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे कसं अन्यायकारक आहे, हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले.

राष्ट्रपतिभवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत म्हणून संबोधिले होते.
तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण ३१ ऑक्टोबर, १९६८ रोजी झाले.

ग्रामगीता या ग्रंथात तुकडोजी महाराज म्हणतात :

संत देहाने भिन्न असती। परि ध्येय धोरणाने अभिन्न स्थिती।
साधने जरी नाना दिसती। तरी सिद्धान्तमति सारखी।।

संत तुकडोजी महाराज यांनी अनेक भजने/कविता लिहिल्या. त्यातीलच ही एक :

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्तु झाली, या झोपडीत माझ्या ॥१॥

भूमीवरी पडावे, ताऱ्याकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या ॥२॥

पहारे आणि तिजोऱ्या, त्यातूनी होती चोऱ्या ॥
दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या ॥३॥

जाता तया महाला, 'मज्जाव' शब्द आला
भीती न यावयाला, या झोपडीत माझ्या ॥४॥

महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
अम्हां जमीन माने, या झोपडीत माझ्या ॥५॥

येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोजा, या झोपडीत माझ्या ॥६॥

पाहून सौख्य माझे, देवेंद्र तोही लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या ॥७॥

'तुकड्या' मती करावी, पायी तुझ्या नमावी
मूर्ति तुझी रहावी, या झोपडीत माझ्या ॥८॥

हर देश में तू ...
हर देश में तू , हर भेष में तू , तेरे नाम अनेक तू एकही है ।
तेरी रंगभुमि यह विश्वभरा, सब खेलमें, मेलमें तु ही तो है ॥टेक॥
सागर से उठा बादल बनके, बादल से फ़टा जल हो कर के ।
फ़िर नहर बनी नदियाँ गहरी,तेरे भिन्न प्रकार तू एकही है ॥१॥
चींटी से भी अणु-परमाणुबना,सब जीव जगत् का रूप लिया ।
कहिं पर्वत वृक्ष विशाल बना, सौंदर्य तेरा,तू एकही है ॥२॥
यह दिव्य दिखाया है जिसने,वह है गुरुदेवकी पूर्ण दया ।
तुकड्या कहे कोई न और दिखा, बस! मै और तू सब एकही है ॥३॥

संदर्भ :

१) इंटरनेट - विकिपीडिया आणि इतर.
२) मराठी विश्वकोश आणि इतर कोश
३) मराठी भाषा उद्‌गम आणि विकास - संपादक : कृ .पा. कुलकर्णी
४) मराठी कविता (११५०-१८४०) - संपादक : वा.रा. ढवळे / व.दि. कुलकर्णी
५) श्री संत तुकाराम : डॉ. पुष्पलता शेट्ये
६) अभिजात मराठी भाषा समिती - २०१३, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र सरकार.
७) लोकोत्तर - गाडगेबाबा : जीवन आणि कार्य
८) अभंग गीते - गुंडोपंत हरिभक्त - १९६२
९) संत साहित्य - डॉ. निर्मल कुमार फडकुले
१०) आठवणीतल्या कविता - भाग १ - ४
११) ज्ञानदेव : विवेकानंद - डॉ. वि. रा. करंदीकर
१२) 'सार्थ अनुभवामृत' - लेखक रा.ना. सराफ
१३) संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश - खंड १
१४) श्री संत तुकाराम - डॉ.पुष्पलता शेट्ये

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहेत वाचक? कुठे आहे आपली भाषा जगाच्या नकाशावर? कुठे आहोत आपण?

आमची मायबोली जागतिक दर्जाची भाषा आहे! तिला तो मान जगभारातून मिळायला हवा. आणि बाहेरच्यांनी देण्यापुर्वी आपण तो द्यायला हवा. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www.esahity.com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 या नंबर ला Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. download करा.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे...

कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

टीम ई साहित्य